## २. माया निरूपण (४७ ओव्या)

जय जय जी सच्चिदानंदा। जय जय जी आनंदकंदा।
जय जय जी आत्मबोधा। परमपुरुषा ॥१॥

शिष्याची विनंती – हे सच्चिदानंद स्वरूपा तुमचा जय-जयकार असो! हे आनंद उगमा, हे स्वसंवेद्य आत्म-स्वरूपा, हे परमेश्वरा तुझा जयजयकार असो.

वासनाशून्यता, धगधगीत वैराग्य आणि अविचल आत्मनिश्चयाचे समाधान या त्रयीबरोबरच अत्यंत कृपाळु असणारा पुरुषच सद्‌गुरु म्हणून शोभतो. शिष्याचे अज्ञान नाहीसे करून त्याला ब्रह्मपदी स्थिर करण्याची त्यांची शक्ती मोठी विलक्षण असते. सद्‌गुरु म्हणजे मनुष्यरूपाने साकार झालेला ज्ञानसागर ईश्वरच आहे.

४ सद्‌गुरुलक्षणे — १. सच्चिदानंद २. आनंदकंद ३. निजबोध ४. परमपुरुष

१. शिष्य जीवरूपाने तर सद्‌गुरु शिवरूपाने अनुभव घेतात. त्यामुळे शिष्य अशाश्वत, जड व अपूर्णतेचे दुःख अनुभवतो. तर त्या उलट सद्‌गुरु सत् चित् आनंद यांचा अनुभव घेत असतात.

२. जीवाचा आनंद दृश्य वस्तुंवर तर सद्‌गुरुंचा आनंद हृदयस्थ ईश्वरातच असतो. तेच आनंदाचे उगमस्थान असते.

३. देहबुध्दीच्या जीवावर 'मी मी' म्हणून मिरवतो तरीसुध्दा अज्ञानीच रहतो. या उलट आत्मबुध्दीच्या भूमिकेवर राहून सद्‌गुरु स्वस्वरूपाचे ज्ञान मिळवतात. ज्ञाता ज्ञेय उरत नाही.

४. प्रत्येक मानव हा स्थळ काळ वस्तु कर्म धर्म यांनी मर्यादित असतो त्यामुळे त्यात अज्ञान, दुःख, भ्रांती हे दोष दिसतात. मात्र सद्‌गुरु सर्वांगाने परिपूर्ण असतात. ते विश्वमनाशी एकरूप झाले असल्याने अज्ञान, भ्रांति, मोह, दुःख यापासून मुक्त असतात. ते चालते बोलते ईश्वरच असतात. दिसायला माणूस असले तरी ते दिव्य पुरुष/परमपुरुषच असतात. माणसाच्या मर्यादा त्यांना उरत नाहीत. माणसाचे कर्म + ईश्वराचे ज्ञान असा मधुर संगम त्यांच्या ठिकाणी असतो.



© www.madhaveeraghuveer.com

गुरवो बहव: सन्ति शिष्यवित्तापहारका:।
दुर्लभ: स गुरुर्लोके शिष्यचित्तापहारक:॥



~~निजबोध~~ - श्री गुरु त्यांच्या शरीरासह ब्रह्मरूप असतात. ब्रह्मज्ञान स्वसंवेद्य असते. त्यालाच 'निजबोध' म्हणतात.

सद्‌गुरु कसे असतात?

फोडुनी शब्दांचे अंतर। वस्तु दाखवी निजसार।
तोचि गुरु माहेर। अनाथांचे।

उपदेश हा शब्दानेच करावा लागतो. पण अर्थ हे शब्दाचे अंतरंग असते. सद्‌गुरु प्रथम शब्दाकडून अर्थाकडे नेतात व नंतर अर्थाच्या पलिकडे असणाऱ्या परमात्मतत्त्वाकडे नेतात. अशा रीतीने स्वस्वरूपाकडे नेणारे गुरु अनाथ जीवांचे विश्रांतिस्थान असतात.

जीव एकदेशी / परिच्छिन्न, एकांगी, अपूर्ण सीमित असतो. परंतु ब्रह्म मात्र सर्वदेशी, सर्वांगी, पूर्ण, असीम, अपरिच्छिन्न असते.

सद्‌गुरूंच्या शब्दांमागे त्यांच्या तपश्चर्येचे सामर्थ्य असते. ते केवळ शब्दांनी शक्तिपात करतात. त्यांचे शब्द जीवाच्या सूक्ष्म शरीरात घुसतात. आणि जीवाची अंतरंग रचना बदलण्याइतका मोठा बदल घडवून आणतात.

शिष्यास न लावितो साधन। न करवितो इंद्रियदमन।
08 SUNDAY
ऐसे गुरु अडक्याचे तीन। मिळाले तरी त्यजावे।

निशेष कामनारहित। ऐसा तो विरळा संत।
अवघ्या वेगळे मत। असे ज्याचे॥

© www.madhaveeraghuveer.com

या मा सा माया।
जिला कायमचे अस्तित्व नाही. भ्रमरूप आहे.
भासते, दिसते पण असत नाही.

जिवासंगे जन्मे मृत्यु जोड जन्मजात
दिसे भासते ते सारे विश्व नाशिवंत।
काय शोक करिसी वेड्या स्वप्निच्या फळांचा॥

© www.madhaveeraghuveer.com

Potential energy converts into Kynetic energy---

शुध्द ब्रह्म - शबल ब्रह्म माया, ही त्याचीच शक्ती आहे.

अनंत ब्रह्मांडाऐसी दिसाळे। मायेने रचिली विशाळे।
ते तुमचे कृपेचेनि बळे। विरती स्वानंद डोही॥२॥

मायेने अगणित प्रचंड विश्वांची रचना केली. पण ती सर्व ठिसूळ ढेकळांसारखी आहेत. मातीचे ढेकूळ पाण्यात सहज विरघळते. त्याचप्रमाणे ही सारी विश्वे तुमच्या कृपेच्या सामर्थ्याने आत्मानंदात विरून गेली.

निराकार परमात्मस्वरूपाला आकार देऊन दृश्य विश्व निर्माण करणारी त्याचीच शक्ती म्हणजे माया। परमात्मा अनंत — त्याची शक्ती अनंत — तिची निर्मिती अनंत

मायेच्या कक्षेत वावरणारा जीव अज्ञानी व अल्पशक्ती असतो. स्वतःच्या सामर्थ्याने त्याला मायेची कक्षा ओलांडून आत्मानंदाच्या सान्निध जाता येत नाही. त्यासाठी सद्गुरु कृपा मदतीला यावी लागते. एकदा का सद्गुरूंची कृपा झाली की जीवाची स्थूल अज्ञानदृष्टी मावळते व सूक्ष्म ज्ञानदृष्टी उदयाला येते.

यद् दृश्यं तद् नष्टम्।

माया हा भ्रम आहे.

अवाढव्य सृष्टी — मोठाले पर्वत, नद्या, सागर दऱ्या डोंगर, पशु-पक्षी, जीव जंतु, किडा मुंगी सिंह असा हा सारा मायेचा खेळ आहे.

भूजळ तेज समीरख रवि शशी काष्ठादिकी घरला। अशी स्थिरचर व्यापुनि अवघे, तो जगदात्मा दशांगुळे उरला।

देहापेक्षा अवयव मोठे नसतात. मायेला कवेत घेणारे ब्रह्म व्यापक आहे.

© www.madhavderaghuveer.com

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

8

9

10

11

12

1

समर्थ- ब्रह्मपिसा-इतर शिष्य भयभीत
केस मोकळे, मळवट, हातात शस्त्र
2 परंतु कल्याण घाबरला नाही. आपल्या हातून
मृत्यु येणे हेच भाग्य!

3

4

5

6

7

© www.madhaveeraghuveer.com

आता स्वामीने जे काही इच्छिले। ते पाहिजे अंगिकारले।
शरणागत आपुले। समर्थे उपेक्षू नये॥ २.३॥
नाशिवंत म्या काय टाकावे। ते मज स्वामीने सांगावे।
मज दातारे करावे। आपणा ऐसे॥ २.४॥

आता सद्गुरूने जी इच्छा प्रदर्शित केली ती शिष्याने स्वीकारलीच पाहिजे. म्हणून शिष्य म्हणतो की मी आपल्याला शरण आलो आहे. मला बाजूला सारू नये. मी नाशिवंत टाकावे हे खरे पण मी प्रत्यक्ष काय सोडावे ते मला सांगा. आपण उदार आहात. आपणासारखे ब्रह्मज्ञानी आपण मला करावे.

सद्गुरूंना मानणे म्हणजे त्यांच्या ज्ञानावर, शहाणपणावर संपूर्ण विश्वास ठेवणे. सद्गुरूंना पूर्ण शरण जाऊन मनापासून प्रार्थना करणे. आणि सद्गुरू हा आपला एकमेव आधार आहे ही भावना ठेवून त्यांच्या चरणाशी लीन होणे.

व्यवहारातील टाकणे ही कृती आहे तर अध्यात्मात टाकणे ही वृत्ती आहे. घरदार, संपत्ती, लौकिक व्यवहार, मुले पत्नी सोडणे हे त्यागाचे बाह्यांग आहे. साधनी माणसाने आपला मीपणा, कर्तेपणाचा अभिमान, विकारांचा आवेग, वासना, वृत्ती-आसक्ती यांना सोडायचे आहे. हे त्यागाचे अंतरंग आहे. आतील त्याग घडून बाहेरील त्याग साधला नाही तरी फारसे बिघडत नाही परंतु अंतरत्याग झाला नाही तर बाह्यत्यागाला मोठे महत्त्व नाही.

नाशिवंत ते हे जाण माया।

शिष्याने (जीवाने) देण्यासारखं असतं ते सर्व म्हणजे घर-दार, सत्ता-संपत्ती, सर्व देऊन टाकलं. पण देणाऱ्याने जो देणारा जीव आहे तो स्वतःकडे ठेवून घेतला आहे. जीवसुद्धा नाशिवंत असल्याने जीवभावसुद्धा गुरूंना अर्पण करावा.

© www.madhavvedraghuveer.com

# आध्यात्मिक देवाण - घेवाण

तुकाराम महाराज म्हणतात.
घेसी तेव्हा देसी ऐसा अससी तू उदार।

घेतल्याशिवाय तू काही देत नाहीस. इथे देखील जीवभाव घेतल्याखेरीज तू आत्मभाव देत नाहीस. तेव्हा शिष्यावर जबाबदारी येते की जीव द्यायचा नाही तर जीवभाव द्यायचा आहे. म्हणजेच 'मी जीव आहे' हा भ्रम काढून टाकून 'मी आत्मा आहे' हे वास्तव स्वीकारायचे आहे. देण्याघेण्याची ही नुसती भाषा आहे. आत्मभाव हा स्वसंवेद्य आहे. स्वयंसिद्ध आहे. नित्यप्राप्त आहे.

आत्मतत्त्व हे अंतःकरणात कायमचे स्थिर आहे. गुरुंनी 'तत्त्वमसि' उपदेश केला आहे, त्याचा जप करायचा नाही तर ते विचारपूर्वक समजून घ्यायचे आहे.

'मी ब्रह्म आहे' 'मी जीव नाही' असा बुद्धिने केलेला निर्णय साधकाने समजावून घेतल्यावर स्थिर झाल्यानंतर तो अखंड जपून ठेवणे, तो सुटू न देणे हे साधकाचे काम।

'चारही देह म्हणजे मी' असे वाटणे यालाच भ्रम, (गाठ) ग्रंथी म्हणतात. यातून स्वतःला अलगद बाहेर काढणे हाच 'मोक्ष'। देह तादात्म्याच्या या ग्रंथीतून सुटायला हवं. त्यासाठी शरीराशी बोलायला हवे. आपण दुसऱ्याशी बोलू शकतो. शरीर माझ्यापेक्षा वेगळे असल्याने शरीराशी बोलून त्याला कामाला लावायचे. मग हळूहळू देह तादात्म्याची ग्रंथी सुटायला लागते, आणि आपण जिवंतपणीच शरीरापासून वेगळा होतो. आणि मग अणुरणिया थोकडा, तुका आकाशाएवढा असा अनुभव येतो.



जे माझे आहे जे मी नाही. Knee Replacement नव्या-जुन्या गुडघ्याशी बोलायला हवे. अवयवांशी आपण बोलत राहिलो तर आपली बंधनातून सुटका होते.



गुरुदत्त मंत्र वेगळा व महावाक्य वेगळे आहे. त्याचा जप करायचा नाही. तर ते समजून आचरणात आणायचे. निजताना Sub conscious mi..

राह तो सीधी है मगर मोड़ सारे मनके है।



असेच मनाशी बोलायला हवे. गफलत करणारे मनच आहे
मन दुःखी असो किंवा आनंदाने नाचत असो,
आपण त्याच्यासारखे वागायला बांधील नाही.
देहतादात्म्यामुळे मी स्वतःला नाशिवंत समजतो.
विवेके कुडी कल्पना पालटावी।
विच म्हणजे निवडणे. जे सत्य आहे ते स्वीकारायचे
असत्य आहे ते सोडून द्यायचे.
आपली शांति आवर्जून सांभाळायची. त्यासाठी खूप
जपायला हवे. जिथे अशांती असते तिथे साधन नाही.
साधन नाही म्हणून मोक्ष नाही आणि जिथे संताप
असतो तिथेच अशांति असते.
साधन म्हणजेच अभ्यास म्हणजेच Practice!
सुखाचे संतोषात रुपांतर होऊ द्यायचे नाही.
दुःखाचे विषादात " "
सुखदुःखाचे तरंग उमटत असतात. पण त्याची लाट
होऊ द्यायची नाही.
वाचलेलं निसटून जाऊ न देणं हीच साधना।
आपण प्रवचन कीर्तनात पुष्कळ काही वाचतो, ऐकतो परंतु
त्यानंतर घरी गेल्यावर जेव्हा प्रपंचसत्यत्वाच उचल घेतो
त्यावेळी ऐकलेलं वाचलेलं सगळं निसटून जातं.
स्थूलत्याग होता सर्वेचि जाते।

ग्रंथि — गाठ । अहम् आणि ही सुरगाठ आहे. त्याला
वक्रतेमुळे गाठी पडतात. विद्वान, सुंदर,
श्रीमंत हे शब्द आले की दोऱ्याला तिढा बसतो.
त्यातून निरगाठी बसत जातात. गाठीच्या आत
शून्यात्मक Space असते.
बंधनापासुनि उकलल्या गाठी



© www.madhaveeraghuwee.com

अहंता
अहम् – अहंकार – ममत्व.
अशा गाठीत आम्ही अडकत जातो.

विच् ७ उ.प. वेवेक्ति, वेविक्ते,
६. उ.प. विनक्ति / विंक्ते ---
विंचरणे, भाग पाडणे, निर्णय करणे.
Discriminate, judge, Determine.
विचक्षण - शहाणा, हुशार, चतुर.
विचार -- ऐहिक, अनात्म गोष्टींविषयी
विवेक - पारिभाषिक संज्ञा.
पारमार्थिक गोष्टींविषयी.

आत्मस्वरूप हे नित्य आहे, तर
दृश्यविश्व अनित्य, क्षर आहे
असा जो निश्चय त्याला आत्मानात्मविवेक---

भिद्यते हृदयग्रन्थिः छिद्यन्ते सर्व संशयाः।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे॥

© www.madhaveeraghuveer.com

ऐकोन शिष्याचे बोलणे । स्वामी म्हणती सावध होणे ।
अवधान देऊन घेणे । आनंदपद ॥ २.५ ॥
शिष्या बहुमन घाली । आता व्याकुळता राहिली ।
येथे वृत्ती चंचळ केली । तरी बुडशी संदेह सागरी ॥ २.६ ॥

शिष्याचे हे बोलणे ऐकून स्वामींनी त्याला दक्ष राहण्याची सूचना दिली आणि मनापासून लक्ष देऊन आनंदपद घ्यावे असे सांगितले.

आतापर्यंत उथळपणा पुष्कळ केला. आता मात्र फार लक्ष द्यावे. व ते मनापासून द्यावे. यानंतरही जर मनाचे भरकटणे चालू राहिले तर तू संशयसागरात बुडून जाशील.

ज्याला आत्मसाक्षात्कार करून घ्यायचा असेल त्याच्या जीवनामध्ये एकाग्रतेला फार महत्त्व आहे. ज्याला एकाग्रता साधते त्याच्या मनाचा स्वैरपणा आपोआप खुंटतो. नित्य अभ्यासाने वृत्तीचा चंचलपणा क्षीण होतो. मन हळूहळू विकल्परहित होऊ लागते.

ज्याला हे साधले त्याला जीवनात अशक्य काहीनाही. हाती घेतलेल्या कार्यामध्ये लक्ष एकाग्र होणे हीच यशाची गुरुकिल्ली आहे. एकाग्रता ही माणसाजवळ असणारी जाज्वल्य शक्ती आहे कोणत्याही क्षेत्रात एकाग्रता हवीच परंतु ईश्वरदर्शन होऊन आनंदपदी स्थिर होऊ इच्छिणाऱ्या अध्यात्म-साधकाला ती प्राणपणाने जपावी लागते. एकाग्रता सहजसिद्ध झाली म्हणजे तो स्वभावच झाला की तिला तपश्चर्या म्हणतात. असा साधक बळाढ्य मायेला पार करून स्वानंदाचा अनुभव घेतो.

Difficulty level वाढत जाते. तेव्हा एकाग्रचित्त हवे.

एक + अग्र | चि + अग्र

Sports, संशोधन, ध्यान, अभ्यास, कला-शिल्प-चित्र नृत्य, गायन |

© www.madhaveeraghuveer.com

सर्वांभूती विश्वंभर.

मैं लागा उस एक से, एक भया सब माहि।
सब मेरा मैं सबनका, तहाँ दूसरा नाहि॥

अद्वैत तत्त्वज्ञान - एकच परमात्मा सर्वत्र व्यापून आहे सर्व रूपे माझीच आहेत. इथे दुसरा कोणी नाहीच.
सर्वांभूती तोच व्यापून आहे याचा अनुभव आला की द्वैतभाव पूर्णपणे लोपतो.
सर्वं खल्विदं ब्रह्म हा अनुभव येतो.

© www.madhaveeraghuveer.com

अग्निसंगे लोहो पिटी तेणे तयाचा मळ तुटे।
मग परिसेंसी झगडता पालटे। लोखंडपण तयाचे ॥२.७
तयाचा मळ झडेना। आणि अभ्यांतर कळेना।
तरी ते सहसा पालटेना। मृत्तिकारूपे ॥२.८॥

लोखंड आगीत टाकून लाल तापवतात. नंतर त्यावर घणाने घाव घालतात. त्या घावांनी त्याच्यावरील गंज निघून जातो. मग परीसाने ते घासले की त्याचे लोखंडपण बदलते. ते सोने बनते.

लोखंडाचा गंज जर गळून पडला नाही तर त्याचा अंतर्भाग प्रगट होत नाही. आणि त्या गंजामुळे मग ते लोखंड काही केल्या पालटत नाही. त्याचे सोने होत नाही.

आत्मा, अंतःकरण व शरीर मिळून जीव बनतो अंतःकरण व शरीर दोन्ही नाशिवंत आहेत. कारण अनात्मा आहे. म्हणून अविनाशी आत्मा व नाशिवंत शरीर (अनात्मा) यांच्या मिश्रणाने जीव तयार होतो. मूळच्या अमूर्त, असीम, अनंत आत्म्यावर अनात्म्याचे आवरण आल्याने तो मूर्त, सीमित व सांत बनतो. त्या आवरणाने त्याचा आनंद लोपतो व तो अज्ञानी, दुःखी असल्याप्रमाणे जगतो.

मूळ आत्मस्वरूपावर साचलेला आणि झाकणारा मळ नाहीसा करण्यासाठी जीवाला वैराग्याच्या अग्नीत तापवावे लागते. त्यावर विवेकाचे घाव घातले की अज्ञान गळून पडते मग सद्गुरुरूप परीसाचा स्पर्श झाला की जीव ईश्वररूप सोने होऊन जातो.

मात्र ज्याचे वैराग्य प्रखर नसते त्या जीवाचे आवरण गळून पडत नाही त्यामुळे आतील मूळस्वरूप प्रकट होत नाही. वर मळ तसाच राहिल्याने परीसस्पर्श घडूनसुद्धा त्याचे सोन्यात रूपांतर होत नाही.

संतांच्या सान्निध्यात राहून सुद्धा अपुऱ्या वैराग्याने अनेक शिष्य तसेच राहतात. परिवर्तन होत नाही



© www.madhaveeraghuveer.com

MAY
SATURDAY **21**



पहले ये मन काग था करता जीवन घात।
8 अब तो मन हंसा भया, मोती चुँगि चुँगि खात।।

9 सद्गुरुकृपेने खऱ्या खोट्याचा निवाडा करता येऊ लागला. त्यापूर्वी मन हे कावळ्यासारखे होते. ते
10 क्षणिक सुखाच्या मागे लागत होते. त्यात आनंद मानत होते. सद्गुरुकृपेने मात्र आत्मानुभूतीच्या आनंदाचे
11 क्षण निवडून निवडून शाश्वत सुखाचा अनुभव घेता येतो।।
एकाच व्यक्तीच्या जीवनात अज्ञानी जीवापासून
12 ते ज्ञानी साधकापर्यंत प्रवास कसा घडतो त्याचे चित्रण या दोह्यात केले आहे.

1

2

3

4

5

6

22 SUNDAY

© www.madhaveeraghuveer.com

१८ जुलै २०१८



म्हणऊन नाशिवंत जितुका मळ । तुवा त्यजावा अमंगळ ।
तो गेलिया तूच केवळ । आहेस बापा ॥ ९ ॥
तरी नाशिवंत ते तू जाण माया । माईक जाईल विलया ।
ते मायेचा विस्तार प्राणसखया । ऐक सांगतो ॥ १० ॥

म्हणून जेवढे काही नाशिवंत आहे ते मलीन आवरण समजावे. त्या अनिष्ट मळाचा तू त्याग कर. ते आवरण गळून पडले की मग तूच तेवढा शिल्लक उरशील. प्राणसख्या, आतापर्यंत जे नाशिवंत म्हणून तुला सांगितले ते सारे मायानिर्मित होय. जे जे मायानिर्मित असते ते ते सर्व नाशिवंत असते. या मायेचा विस्तार आता तुला सांगतो.

आत्मदर्शन होण्यास नवीन काही निर्माण करावे लागत नाही. नाशिवंताच्या नादी लागल्याने आपले मूळ स्वरूप पडद्याआड गेले. त्या नाशिवंताचा नाद सोडायचा मग पूर्वी साचलेले नाशिवंत निस्तरायचे. अशा रीतीने आवरण झडले की पडद्याआड लपलेले स्वरूप स्पष्ट होईल. मग जिकडे तिकडे तेच स्वरूप अनुभवायला येईल.

माया ही अखेर त्या ईश्वराचीच शक्ती असल्याने ती देखील ईश्वरासारखीच अमूर्त, असीम व अनंत आहे. या दृश्य विश्वाच्या कानाकोपऱ्यात तिचा अपार विस्तार आहे. तो ध्यानात येण्यास लागणारी सूक्ष्म दृष्टी संत देतात.

नाशिवंताची व्याख्या - जे माझे आहे ते मी नाही. जो माझे असतं ते सर्व नाशिवंत आहे. म्हणून हा जो [illegible]तया (दिखाऊ) मी आहे तोही नाशिवंत आहे पण खरा जो मी आहे तो अविनाशी आहे. त्याचा अनुभव घेणे हेच परमार्थ आहे. सर्व साधना करायच्या त्या या खोट्या 'मी' ला हाकलून देऊन खऱ्या 'मी' ला राजपद द्यायचे.

© www.madhaveeraghuveer.com

१. माझं शरीर ठणकत आहे.
२. मी माझं काम मन लावून करतो.
३. ऐनवेळेला माझ्या बुद्धीने मला दगा दिला.

शरीराला तर सहा विकार आहेत. शरीर म्हणजे मी नाही.
मन हे संकल्प-विकल्प करते. तो त्याचा धर्म आहे.
स्मरणशक्ती हा बुद्धीचा धर्म आहे. तेव्हा ती तल्लख आहे का अडाणी हा विचार बुद्धीपाशी सोडायला हवा. त्यातून निर्माण होणारा अहंकार वा न्यूनगंड या दोन्हीतून सुटका होण्यासाठी बुद्धी म्हणजे मी नाही हे समजून घ्यायला हवे. मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च।

© www.madhaveeraghuveer.com

अहम ऐसे जे स्फुरण। तेचि मायेचे लक्षण।
तये मायेपासून त्रिगुण। गुणापासून भुते॥२.११॥
पृथ्वी आप तेज वायो आकाश। सृष्टि रचिली सावकाश।
येथे दृश्य आणि अदृश्य। सकळ माया॥२.१२॥

केवल परमात्म्याच्या ठिकाणी 'मी आहे' असे अत्यंत सूक्ष्म भान प्रथम निर्माण झाले. स्वतःचे ते स्मरण हेच मायेचे खरे रूप होय. मायेपासून सत्त्व, रज, तम हे तीन गुण निर्माण झाले. त्या गुणांपासून पंचमहाभूते झाली.

पंचमहाभूतांपासून प्रथम अव्यक्त व नंतर व्यक्त सृष्टीरचना क्रमाक्रमाने निर्माण झाली. पण व्यक्त व अव्यक्त सारी सृष्टीरचना मायानिर्मित आहे.

मूळ परमात्मस्वरूप एकच एक म्हणजे अद्वय व अखंड आहे. त्यालाच सद्वस्तु म्हणतात. या एकाच परमात्म्यामध्ये अनेकपणाने काठोकाठ भरलेले विश्व प्रत्ययाला येते. मूळ एकच एक असणारा परमात्मा त्याच्याच शक्तीने व त्याच्याच संमतीने अनेकपणाने विश्वात विलसतो. परमात्म्याचीच एक शक्ती माया आहे. तीच त्याला अनेक रूपे देऊन साकार करते व त्या रूपांना पाहता पाहता निराकारात घेऊन जाते. माया ही परमात्म्याला न सोडता त्याच्याच अधिष्ठानावर आपली करामत दाखवू लागते.

परमात्मस्वरूप अविनाशी खरे पण त्याच्यातून माया जे काही आकाराला आणते ते मात्र सर्व नाशिवंत! आपण अनुभवत असलेल्या व्यक्त विश्वाचे बीज मायेमध्ये असते. माया म्हणजे अव्यक्तपणाची परिसीमा क्रमाक्रमाने तिला व्यक्त स्वरूप येते.

मूळ माया - गुणक्षोभिणी माया - पंचमहाभूते - विश्व
गुणमायेपासून दृश्य विश्वापर्यंत सारी सृष्टीरचना घडते मोडते म्हणून ती विनाशी आहे. शेवटी मूळमायेसकट परमात्म्यात विलीन होते.

© www.madhaveeraghuveer.com

MAY 26
THURSDAY

S M T W T F S S M T W T F S S M T W T F S S M T W T F S S M T W T F S
1 2 3 4 5 6 7 8 9 10 11 12 13 14 15 16 17 18 19 20 21 22 23 24 25 26 27 28 29 30

परा प्रकृति – Higher
अपरा प्रकृति Lower

8
9
10
11
12
1
2
3
4
5
6

© www.madhaveeraghuveer.com

येक माया दो ठायी वाटली । प्रकृती आणि पुरुष जाली ।
जैसी दो दिसांची बोली । येकाचि परवा ॥

परवा हा शब्द एकच दिवस दर्शवितो. पण त्यामुळे मध्ये आज व उद्या हे शब्द अंतर्भूत असतात. त्याचप्रमाणे मूळ माया एकच आहे पण दोन ठिकाणी विभागून ती पुरुष व प्रकृति होते.

मायेपासून निर्माण झालेल्या या विश्वात चेतन व अचेतन असे दोन प्रधान घटक आढळतात. एकाच मायाशक्तीचे ते दोन आविष्कार आहेत. संवेदनशील जिवंत चेतनाला पुरुष म्हणतात तर जड अचेतनाला प्रकृति असे म्हणतात. चेतनाला व्यक्त होण्यासाठी जे माध्यम लागते ती प्रकृति आहे. प्रकृति ही स्वतंत्र नाही ती पुरुषाच्या आधीन आहे. परंतु दोन्ही तत्वे एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत.

(१८) ज्ञानमार्गामध्ये आत्मानात्मविवेक प्रधान असतो. त्यात ज्ञाता - ज्ञेय - ज्ञान अशी तीन अंगे असतात. एकमेकांपासून ती निराळी काढता येत नाहीत. त्यांना त्रिपुटी म्हणतात.

आत्म्यावर अनात्म्याचे आवरण आल्यामुळे आत्मविस्मृती होते. त्यातून अनात्मच खरे वाटू लागते. हा गैरसमज काढून टाकण्यासाठी ज्ञानमार्ग आचरायचा. वास्तविक पुरुष हा प्रकृतीचा केवळ द्रष्टा आहे. पण अविवेकामुळे तो प्रकृतीच्या नादी लागतो. तिच्यात गुंतून पडतो. मात्र अंतर्मुख ध्यानाची पक्वावस्था म्हणजे समाधि! तिथे मात्र पुरुषाला आपले मूळ द्रष्टेपण प्राप्त होते.

©www.madhaveeraghuveer.com

माया ज्ञाता ज्ञेय ज्ञान । माया ध्याता ध्येय ध्यान ।
माया हेचि समाधान । योगियांचे ॥ २.१४ ॥

ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान ही त्रिपुटी तसेच ध्याता, ध्येय, ध्यान ही त्रिपुटी देखील मायेच्या कक्षेत येते. इतकेच नाही तर ध्यानाने साधणारी योगसमाधि सुध्दा मायेच्या कक्षेतच येते.

ज्ञानमार्गामध्ये आत्मानात्मविवेक प्रधान असतो. आत्मानात्म विवेकाच्या प्रक्रियेत त्रिपुटीतील तीन अंगे एकमेकांपासून विलग करता येत नाहीत.

समर्थांनी मायेला फार श्रेष्ठ म्हटले आहे तसेच छळणारी असेही म्हटले आहे. ती अत्यंत उपयुक्त आहे तसेच त्रास देणारी आहे. तिचा नीट उपयोग करून घेतला तर ती लाभदायी आहे मात्र तिच्या आहारी गेलो तर मात्र त्रासदायक ठरू शकते.

सर्वच साधने मायिक आहेत. हे पुस्तक, वही सर्व मायेपासून बनले आहे. परंतु त्यांच्या उपयोगाने आपल्याला मायेचे अधिष्ठान जे ब्रह्म तिथपर्यंत जाता येते आणि तेव्हा या सर्व साधनांचे काम संपलेले असते. जे जे मायिक आहे ते कवटाळून न बसता कधी ना कधी तरी सोडून द्यावे लागते.

हिशेब झाला मायेचा । जाला निवाडा तत्वांचा ।
साध्य होता साधनाचा । ठाव नाही ॥ २०.१०.२७ ॥

साधना हेसुध्दा साधनच आहे. साधना मायिक आहे आणि मायिकाला कवटाळून बसले तर मायेच्या अधिष्ठानाचा ब्रह्माचा अनुभव येणार नाही, हे मनावर ठसविण्यासाठी या ओव्या म्हटल्या जातात. परंतु त्या यांत्रिकपणे न म्हणता त्यातील गर्भितार्थ लक्षात घ्यावा.

©www.madhaveeraghuveer.com

साधक असण्यासाठी सावध असावे लागते.

ब्रह्म हे एकमेव, भेदरहित आहे. माया मात्र भेदाने भरलेली आहे. हा ग्रंथ, वेदांतशास्त्र, ईश्वर, सद्गुरु हे सर्वच मायिक आहेत. आचार्य म्हणतात.

गुरुर्नैव शिष्यः। कारण गुरुशिष्यातील द्वैत इथे सरून जाते. उपदेश करणारा किंवा घेणारा कोणी नाही. उपदेश संपल्यावर शिष्य हा शिष्य राहत नाही. गुरु तर आधीच मुक्त असतात. आत्मा एकमेवाद्वितीय असल्याने दोन्ही एकाच ठिकाणी पोहोचतात.

अविज्ञाते परे तत्त्वे शास्त्राधीतिस्तु निष्फला।
विज्ञातेऽपि परे तत्त्वे " " ॥

भटजींचा उपयोग लग्न लावण्यापुरताच असतो.
नदीच्या पलीकडे गेल्यावर आता नावेचा काही उपयोग नाही म्हणून नाव बुडवायची नाही. तर इतर चार उतारूंना त्या नावेत बसवून पैलतीरावर नेण्यासाठी ती उपयोगी आहेच. तसेच शास्त्र, परंपरा टिकवून ठेवण्याचे काम संत करतात.

© www.madhavelaguruvar.com

माया सच्चिदानंद। माया आनंदाचा कंद।
माया हेचि निजबोध। शब्दरूपे ॥२.१५॥
आत्मा ब्रह्म आणि स्वरूप। हेही मायेचेचि रूप।
रूप आणि अरूप। सकळ माया ॥२.१६॥

ईश्वराचे वर्णन करताना सच्चिदानंद, आनंदकंद स्वस्वरूपज्ञानसंपन्न असे शब्द वापरले जातात. हे शब्द देखील मायेच्या कक्षेतच येतात.

मनुष्य सांत, सीमित, मर्यादित आहे. सांतपणाच्या प्रांतात व्यवहार करण्यासाठी भाषा (शब्द) लागते. परंतु परमात्मा मात्र अनंत असल्याने शब्द त्या मूळस्वरूपापर्यंत पोहोचू शकत नाहीत. परमात्म्याच्या मूळ स्फुरणाचे वर्णन म्हणजेच मूळ मायेचे वर्णन आहे. तिथपर्यंत मायेची कक्षाच आहे.

यतो वाचा निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह - - - - - -

परमात्मा अद्वय, अखंड आहे. त्याच्यामध्ये दुसरे काहीच नाही. तो शुद्ध आहे, केवळ आहे. पण या जगातील माणूस मात्र त्याची कल्पना करू शकत नाही. कारण विचार करायचा झाला तर तो प्रथम रूपाचाच असतो. रूप म्हणजे इंद्रियगोचर आकार! अरूप म्हणजे एकच सूक्ष्म तत्त्व अनेक रूपांना समानपणे व्यापून असते. सर्व माणसांना माणूसपणा व्यापून आहे. तेव्हा ते सामान्य, आकारशून्य होते. स्वरूप - स्व म्हणजे मी. स्वरूप म्हणजे आत्म्याची स्वाभाविक स्थिति! आत्मा व्यक्तीमध्ये व विश्वामध्ये व्यापून उरणारे व त्यांना धारण करणारे जे शुद्ध चैतन्य त्याला आत्मा म्हणतात. ब्रह्म बृहत् म्हणजे अतिशय मोठे, सर्वाहून मोठे. असीम अनंत असे ते ब्रह्म!

ब्रह्म म्हणजे अदृश्य परमात्मा!

मी साधक आहे हे दुसऱ्याला कळू न देण्यात भूषण आहे.



| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | |

सत चित आनंद यातील प्रत्येक पदाला नियत अर्थ आहे
शब्दही मायिक आहे.∴ शब्दाच्या भरवशावर राहता
येत नाही पण शब्दावाचून चालत नाही. पण शब्द
म्हणजे सर्वस्वही नाही. येथे शब्द पांगुळला — ज्ञानेश्वरी
यतो वाचा निवर्तन्ते। — उपनिषद

आपले जीवन ही परमार्थाची प्रयोगशाळा आहे.
परमार्थात शिकलेले दृष्टांत सिद्धांत तत्त्वज्ञान वापरण्यासाठी
जीवनाच्या प्रयोगशाळेचा उपयोग करायचा.

संसार उपाधि न सांडता। प्रपंचत्याग न करता।
जनामध्ये सार्थकता। विचारेचि होय॥

मायिकता लक्षात आली तर दृष्टीकोन बदलतो.

साधना ही Continuous Process आहे.

Do not isolate yourself, insulate yourself.
जगापासून लांब जायचे नाही तर अलिप्त व्हायचे.

स्वतःच्या भोवती एक अदृश्य कवच तयार करून
घ्यायचे आणि मग खुशाल जगात वावरायचे.

जे जे Relative आहे ते सगळं मायिक असतं.

जीवन वापरायचं असतं घालवायचं नसतं!

संगीतातील सात स्वरांप्रमाणे जीवनाचा आनंद घेत
साधना केली तर कंटाळवाणी होत नाही.

ऐसी ही विचारांची कामे। उगेच भ्रमो नये भ्रमें।
जगदीश्वरे अनुक्रमें। सकळ केले॥

जीव शिव आणि ईश्वर । हाही मायेचाचि विस्तार ।
विश्वरूप विश्वंभर । अवघी माया ॥१७॥
माया मनास चाळक । माया बुद्धीस व्यापक ।
माया येकी अनेक । ऐसे बोलणे ॥१८॥

जीव, शिव आणि ईश्वर हा मायेचा विस्तार आहे. विश्वरूप व विश्वंभर हे देखील मायेतच येतात. माया मनाला गती देते. माया बुद्धीला आच्छादून असते. एकच एक सद्वस्तुमध्ये मायाच अनेकपणा दाखवते, असे म्हणतात.

परमात्मस्वरूपात जे प्रथम स्फुरण झाले, त्याला 'मी ब्रह्म आहे' हे भान आले ते सच्चिदानंद स्वरूप ईश्वर होय. तीच मूळमाया आहे. माया म्हणजेच ईश्वराशी अभिन्न असणारी त्याची सृजनशक्ती! तिच्या द्वारेच ईश्वराने विश्वनिर्मितीचा संकल्प [struck out] करतो. तो संकल्प हिरण्यगर्भाच्या रूपाने विश्वाची नियती ठरवतो. विश्वातील प्रत्येक घटनेला तो संकल्पानुकूल दिशा देतो. त्याला विश्वंभर असे म्हणतात. पण नियतीला अनुसरून प्रत्येक घटना नियोजित करणे व ती घडवून आणणे हे कार्य विश्वमन करते. त्यालाच विश्वरूप म्हणतात. प्राण्यांमध्ये राहणारे व अज्ञानाने सीमित व सांत झालेले चैतन्य म्हणजे जीव होय. विश्वामध्ये राहणारे, मायेची जाणीव असणारे पण मायेच्या अमलाखाली नसणारे व जीवाला आपलेपणाने पाहणारे चैतन्य म्हणजे शिव होय। जीव आणि शिव हे कल्पनासापेक्ष आहे.

विश्वातील चराचरामध्ये, प्रत्येक घटनेमध्ये मायाशक्ती काम करते. तीच माणसाच्या मनाला संकल्पविकल्परूपाने चंचल बनवते. तीच बुद्धीवर अंमल गाजवून स्वार्थीचे विचार करवून घेते. या दृश्य विश्वात एकच माया अनेकपणाचा खेळ करते.

© www.mohanveeraghuveer.com

Life is like an ice cream
Taste it or Waste it...



2016
MAY

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | |

JUNE
SATURDAY **04**

आपलं मन मनन करते. म्हणजेच विचार करते. या विचारामागे कोणती ऊर्जा आहे. जिथे जिथे हालचाल आहे, क्रिया आहे, कर्म आहे त्यामागे कोणतीतरी ऊर्जा असतेच असते. इथे ऊर्जा पुरवणारे प्राण आहेत. प्राण वायुतत्त्वाचे आहेत. वायुतत्त्व पंचभौतिक आहे म्हणजेच मिथ्या आहे. याचाच अर्थ मनाच्या क्रिया ही मायिक आहे आणि जे मायिक आहे ते सोडून द्यायचे.

कोणत्याही विचारांपासून अलिप्त राहायचे. असे जर साधले तर अनुकूल-प्रतिकूल दोन्ही विचार यायचे बंद होऊन जाते. अनावश्यक विचारांनाही कळते की या व्यक्तीपाशी आपल्याला किंमत नाही मग हळूहळू ते विचारच बंद होऊन जातात आणि आवश्यक विचार नेमके तेवढेच यायला लागतात. सुरुवातीला अनावश्यक विचार बंद पडण्यासाठी कष्ट करावे लागतात पण पुढे या पद्धतीने आपण आपली घडी बसवून घेतली तर हे प्रतिकूल विचार प्रवेश करत नाहीत.

विवेकानंद व्याख्यानापूर्वी आरशात पाहून आपला फेटा सारखा करत होते. ते पाहून शिष्याला ते देहतादात्म्य वाटले. वास्तविक स्वामीजी स्वतः आत्मबोधातच रममाण होते. हे देहभान त्यांना उसने आणावे लागत होते.

सामान्य प्रापंचिकांना देहबुद्धी जाऊन आत्मबुद्धीसाठी खटपट करावी लागते. संतांना मात्र देहाचे भान येण्यासाठी असे प्रयत्न करावे लागतात. आमचे देहावरचे प्रेम हे उघड

05 SUNDAY

आहे ते आवरण्यासाठी आम्ही धडपड करतो. परंतु थोर विभूतींना मात्र व्यवहार करण्यासाठी देहभान उसने घ्यावे लागते.

संतांच्या चरित्रातून हे सर्व आपण समजून घ्यायचे व त्यातील काही भाग तरी आपल्या आचरणात आणण्यासाठी प्रयत्न करायचे यातच जीवनाची सार्थकता आहे.

Do not isolate yourself
Insulate yourself.

माया देहास चालवी। माया देहास बोलवी।
माया हृदयास दाखवी। नेत्री रिघोनिया ॥१९॥
मायेचेनि माया चाले। मायेचेनि माया बोले।
मायेचेनि माया हाले। वायोरूपे ॥२०॥

मायेच्या शक्तीने देह चालतो. मायेच्या शक्तीने वाणी शब्द बोलते. मायाच डोळ्यात शिरून पदार्थ दाखवते. मायाच कार्य करते व करवून घेते. माया बोलते व बोलण्याची शक्ती देते. माया चलनवलन करते व त्याची शक्ती देते. शक्तीच्या रूपाने तीच हे सर्व घडवून आणते.

वस्तुतः आत्मरूपाचा मायेशी काही संबंध नाही. पण तरी सुद्धा आम्ही दृश्यात रमत असल्याने आम्हाला बाहेरचे जाणून घेण्याची फार उत्सुकता असते. कोण कुठे गेला? कोणाच्या घरात काय चालू आहे? हे कळणं आवश्यक वाटतं! खरं तर हे सर्व अनावश्यक आहे.

आवश्यक तेवढंच बोलावे आवश्यक तेवढंच पहावे. सर्वच गोष्टी आवरत्या घ्याव्यात. अशा आवरण्यामुळे, नियमित झाल्यामुळे आतला आनंद Disturb होत नाही. नाहीतर सतत दुसरे अनावश्यक विचार करत राहिले तर वृत्ती निर्माण होते व ती सतत बाहेर धाव घेते. हीच धाव आत वळवायची आहे. संत सांगतात – आत जा. मुळाकडे जा. आत्म्यामुळेच डोळ्यांना पाहण्याची शक्ती, कानांना ऐकण्याची शक्ती मिळते. ज्याच्या सत्तेमुळे जीवाला ज्ञान होते त्याचा विसर पडणे म्हणजे बंधन! मूळ ब्रह्माचा विसर पडला तर विषयांचे चिंतन सुरू होते. चित्त क्षुब्ध होते. त्यावर उपाय एकच – जिथून ज्ञान होते तिथेच जर चित्त एकाग्र करता आले तर आनंदाला, सुखाला, शांतीला धक्का लागत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

सद्विद्या - भगवत्चिंतन
अविद्या - व्यवहार



परमार्थातून काय मिळवायचं?
परमार्थाच्या उद्दिष्टात नेहमीच सकामतेची मिसळ केली जाते. कारण आपण प्रारब्ध आहे तसे स्वीकारत नाही.
जैसी स्थिती आहे। तैशापरी राहे।
कौतुक तू पाहे। संचिताचे॥
इतकं संतांनी शिकवून सुध्दा आम्ही काहीच शिकत नाही.
सगळी कर्तव्ये मनापासून पार पाडायची आणि जे समोर येईल ते शांतपणे स्वीकारायचे.

केनोपनिषद
श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनो यद्
वाचो ह वाचस् उ प्राणस्य प्राण:।
चक्षुषश्चक्षुरतिमुच्य धीरा:
प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति॥

चोरवा मेळा



© www.madhaveeraghuveer.com

तो शिष्य म्हणे जी ताता। माया चाले स्वरूपसत्ता।
अरे! सत्ता तेचि तत्वता। माया जाण॥२१॥
तरी मायेने स्वइच्छया असावे। आणि स्वरूपसत्तेने नसावे।
मनास आले तैसे करावे। हे कैसी घडे॥२२॥

शिष्य म्हणतो की, महाराज माया परमात्मस्वरूपाच्या सत्तेने व्यवहार करते ना? त्यावर स्वामी उत्तर देतात "अरे होय. सत्ता ही खरोखर मायाच आहे."

तर मग माया आपल्या इच्छेने वागते म्हणायचे. ती परमात्मसत्तेच्या आधीन नसते. आपल्या मनात येईल तसे ती वागते. हे कसे काय घडते?

परमात्मसत्तेला जेव्हा स्वतःचे भान येते. 'मी ब्रह्म आहे' अशी निर्मळ जाणीव होते. ती ज्ञानमय, अनंत जाणीव तितकीच शक्तीसंपन्न असते. त्या शक्तीलाच सत्ता असे म्हणतात. म्हणजेच मूळमाया! हे ऐकून शिष्याच्या मनात शंका येते — मायाच मायेचे व्यवहार करते काय घडवून आणते? खरे तर परमात्मस्वरूपाची सत्ता घडवून आणते ना!

तेव्हा स्वामी म्हणतात अरे सत्ता काय किंवा स्फुरण काय दोन्ही म्हणजे मायाच नाही का!

सत्ता हीच माया म्हटले म्हणजे मायाच सर्व काही करते असा अर्थ होतो. म्हणजे मायेला परमात्मस्वरूपाहून वेगळे अस्तित्व येते. वास्तविक परमात्मा अद्वय आहे. अगदी एकच एक आहे. त्याचे स्वातंत्र्य अबाधित आहे. त्यास येणारे भान व त्यातून निर्माण होणाऱ्या ईश्वर, शिव, जीव, गुणमाया, विश्व या संकल्पना पूर्णपणे वेगळ्या असूच शकत नाहीत. परमात्म्याहून मायेला स्वतंत्र अस्तित्व आले तर द्वैत मानावे लागेल ही शिष्याची शंका आहे.

© www.madhaveeraghuveer.com

JUNE THURSDAY 09

2016 MAY

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | |

अघटित घटना पटीयासी माया।

8

9

10

11

12

1

2

3

4

5

6

© www.madhaveeraghuveer.com

खऱ्यावरी लटिके चौताळले । लटिके मर्यादेने राहिले ।
ते तुवां गर्भांधाने देखिले । हे अघटित वार्ता ॥२३॥
तैसी माया हे नाथिली । आणि स्वरूपसत्तेने चालिली ।
ते तुवा गर्भांधाने देखिली । हे वार्ता सांगसी ॥२४॥

बुद्धी शांत होऊन साधक जेव्हा प्रतिभेच्या प्रांतात प्रवेश करतो तेव्हा त्याला परमात्मस्वरूपाची अनुभूती येते. ती दृश्याच्या अनुभवाहून विलक्षण असते.

जे खरं आहे त्यावर खोट्यांचे रान चहूबाजूंनी माजले तसेच जे खोटे आहे ते आपल्या सीमेत राहिले आणि जन्मांध असता तू त्याने ते पाहिले. ही सगळी मोठी विलक्षणच गोष्ट आहे.

त्याचप्रमाणे नसलेली माया ती आहे म्हणतोस, ती स्वरूपसत्तेने चालते असे म्हणतोस आणि हे सारे जन्मांध जो तू त्याने पाहिले अशा गोष्टी सांगतोस.

सत म्हणजे जे नेहमी असतेच. ते नाही असे कधीच होत नाही. आणि असत म्हणजे जे नाही ते। जिथे सत आहे तिथे असत असणे शक्य नाही.

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।

जे नाहीच ते मर्यादेत राहिले याला काहीच अर्थ नाही आणि जो जन्मापासून आंधळा आहे, त्याला पाहणे शक्यच नाही। त्याने पाहिले म्हणता, याला काहीच अर्थ नाही. यात अंतर्गत विरोध आहे. वदतो व्याघात आहे.

हे शिष्या तुझे असत्य आहे. नसलेल्या मायेला तू आहे असे मानतोस. शिवाय ती स्वरूपसत्तेने चालते असे म्हणतोस आणि जन्मांध असा तू हे डोळ्याने पाहतोस. काय खरे नि काय खोटे?

इंद्रियगोचर जगाचे ज्ञान करून घेण्यासाठी ज्ञानेंद्रिये महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यातल्या त्यात डोळे

डोळे - कमळासारखे, माशासारखे असले किंवा पद्माक्षी, मीनाक्षी, कामाक्षी अति सूक्ष्म दृष्टी / दूरदृष्टी असली तरी सूक्ष्म दृष्टी नसेल तर तो अंध मानावा. तर फारच महत्त्वाचे आहेत.

तज्ञ डॉक्टर नुसत्या दृष्टीने रोगलक्षणे ओळखतो. रत्नपारखी नजरेने खरे खोटे जाणतो. कुशल इंजिनीयर यंत्रातील दोष पाहूनच ओळखतो. कार मेकॅनिक, माळी, निष्णात सोनार

खरे जर व्यवहारात असेल तर अध्यात्ममार्गात ईश्वरस्वरूप पाहण्यास लागणारी सूक्ष्म दृष्टी संतांकडून शिकावी लागते. ही सूक्ष्म दृष्टी नसणारा जन्मांधच समजावा. त्याला परमात्मा व त्याची माया यांचा संबंध समजूच शकत नाही आणि म्हणून संत त्याच्या बोलण्याला किंमत देत नाहीत.

समर्थ शिष्याशी अत्यंत परखड शब्दात बोलतात. याचे मुख्य कारण म्हणजे शिष्याकडून कसलीही अपेक्षा नाही. काय मिळणार यावर डोळा नाही; त्याची फिकीरही नाही. ∴ इथे शिष्याला गर्भांध म्हटले आहे. आंधळा आहे म्हणूनच मुळात नसलेली माया अधिष्ठानाच्या सत्तेवर काम करते असे त्याला वाटते.

वास्तविक माया अस्तित्वातच नाही. समजण्यापुरती सांगण्यापुरती स्वीकारलेली संकल्पना आहे. मुळात ती नाहीच. सोय म्हणून स्वीकारली. जी मुळातच नाही ती स्वरूपाच्या सत्तेवर काम कशी करेल?

मग माया कशी आहे? तर प्रतीति मात्र सत्तावान — म्हणजे जेवढा वेळ प्रतीती येते तेवढा वेळ सत्ता असते.

12 SUNDAY

शिष्यही वस्ताद आहे. परिसीमेची उत्सुकता आहे व तो सावधपणे ऐकतो आहे

जे जालेचि नाही सर्वथा। तयावरी निर्गुणाची सत्ता।
ऐसे हे ज्ञातेपणे बोलता। तुज लाज नाही॥२५॥

माया मुळी कधी निर्माणच झाली नाही. अशा त्या नसलेल्या मायेवर निर्गुण परमात्म्याची सत्ता चालते असे शिष्य म्हणतो तेव्हा त्याला उद्देशून समर्थ म्हणतात "अरे, परमात्मा व माया यांचा संबंध समजल्याची कल्पना करुन तू हे बोलतोस तुला याचा संकोच कसा काय वाटत नाही?

गुरुंचा दृष्टीकोन ब्रह्मसाक्षात्कारावर अधिष्ठित आहे तर शिष्य अज्ञानी आहे. शिष्याचा दृष्टीकोन विश्वाच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित आहे. दोन्हीत फरक आहेच. गुरु ज्ञानाचा सिद्धांत शिष्यासमोर मांडत असतानाच त्याचा अज्ञानाचा दृष्टीकोन कसा सदोष व अपुरा आहे हे शिष्याला पटवून देतात.

परमात्मतत्त्वाचा साक्षात अनुभव आला की जीव व जगत याकडे ज्ञानदृष्टीने पाहता येते. त्या ज्ञानदृष्टीतून हे निश्चित समजते की सर्वत्र एकच परमात्मतत्त्व आहे दुसरे काही नाही. दुसरे काही निर्माण झालेच नाही. जग निर्माण झाले असे मानले तर त्याचे कर्तृत्व परमात्म्याकडे येते परंतु तो तर अकर्ता आहे. त्या केवळ स्वरुपस कर्तृत्व आहे असे मानले तर ते निष्प्रपंच, निर्विकारी व नित्य आहे या प्रत्यक्ष अनुभवाला बाध येतो म्हणून मग जग झालेच नाही. एकले एक परब्रह्मच सदैव सद्रूपाने स्वतःच्या ठिकाणी स्फुरते असे म्हणावे लागते. हाच समर्थांचा अजातवाद

अगा जे घडलेचि नाही। त्याची वार्ता पुससी काई॥

शिष्याला परमात्मस्वरुपाचे साक्षात ज्ञान नाही, तो जगात हे खरे मानतो त्याला असणारे जगाचे ज्ञान 

दोरीवर आसमान होणारा साप जरी खोटा असला तरी भीती मात्र खरी आहे आणि ती सगळ्यांना वाटत नाही. (ज्यांच्याकडे (अज्ञान) वाटते



संबंधमय असते :- परमात्मा - ईश्वर - माया - जगत - जीव यांच्या परस्पर संबंध लावण्याचा तो प्रयत्न करतो. त्यामुळे तो संभ्रमात आहे.

"अजातवादाप्रमाणे जग निर्माणच झाले नसेल तर मग हे दिसते ते काय आहे?" असा त्याचा प्रश्न आहे.

यावर सद्गुरु उत्तर देतात. जीव अज्ञानी असल्याने त्याला परमात्मस्वरूप जसे आहे तसे दिसत नाही. नसेल अज्ञानाने परमात्म्यावर त्याला जगाचा भास होतो. [रज्जुसर्प] परमात्म्याच्या मायाशक्तीमुळे हा भास खरा वाटतो. मात्र स्वरूपज्ञान झाले की विश्व वेगळे रहातच नाही. परमात्म्याहून वेगळे असे वस्तुतः काही निर्माणच झाले नाही.

हरिचिया दासा हरि दाही दिशा ।
भावे जैसा तैसा हरि एक ॥
हरिमुखी गाता हरपली चिंता
त्या नाही मागुता जन्म घेणे ॥
जे जे दृष्टी दिसे ते ते हरिरूप
पूजा ध्यान जप त्यासी नाही ॥

© www.madhavveeraghuveer.com

(उरली माया)

सकळ माया ऐसेही म्हणता। आणि जालीच नाही ऐसेही सांगता।
तरी म्यां काय करावे आता। सांगा स्वामी ॥२६॥

स्वामी, एकीकडे सर्व मायाच आहे असे म्हणता आणि दुसरीकडे माया झालीच नाही असेही म्हणता. परस्पर-विरोधी अशा विधानांमुळे मी काय करावे हे मला समजत नाही. ते तुम्ही आता सांगा.

संतांच्या ग्रंथांचा अभ्यास करताना, अनुभूतिप्रधान स्वरूपवर्णन आणि बुद्धिप्रधान स्वरूपवाद यांची व्यवस्था कशी लावावी हे समजायला हवे.

बुद्धी खूप ताणली तर ती अनंताच्या उंबरठ्यापर्यंत नेते. पुढे ती नामोहरम होते, मागे फिरते. ती सांताचा प्रांत ओलांडू शकत नाही. आणि म्हणून स्वरूपानुभवाचे वर्णन आणि स्वरूपवाद यात विरोध आढळतो. हा विरोध उकलण्यासाठी संतांना शरण जावे. हाच उपाय आहे.

अंतकाळी कोणी नाही बा सांगाती
साधूंचे संगती हरि जोडे।
कोटिकुळे तारी हरि अक्षर दोन्ही।
एका जनार्दनी पाठ केली॥

मनाचे ऐकू नकोस – मशा मेंढपाळ
समर्थांचा उपदेश – उन्मनी अवस्था –

8

गीतारहस्य- शरीर हे गोडाऊन आहे. मन हा कारकून आहे. ज्ञानेंद्रियांकडून मिळालेल्या माहितीमध्ये स्वतःची भर घालून कर्तव्य निर्णय घेते व तसा आदेश कर्मेंद्रियांना देते.

9

10

11

12

नाही म्हणावे तर आहे आणि आहे म्हणावे तर नाही. म्हणून वेदांती 'मिथ्या' शब्द वापरतात म्हणजे जे रूप प्रत्ययाला येते ते त्याचे खरे रूप नाही. हिरा मौल्यवान तर कोळसा स्वस्त परंतु दोन्हीच्या मागे कार्बनच आहे.

1

2

3

जिलबी, लाडू, शिरा, चॉकलेट, साखरफुटाणा या सगळ्यांच्या मागे आहे ती साखर! साखरेच्या मागे आहे ते प्रोटान! परंतु जर प्रोटान नसता तर साखर दिसली नसती व पुढे हे सगळे पदार्थच झाले नसते

4

5

6

© www.madhaveeraghuveer.com

अरे। मनासी जे जे अनुभविले। ते ते मायिक नाथिले।
तितुके तुवा टाकिले। पाहिजे स्वानुभवे॥२७॥
सकळ ही माया परी नाथिली। स्वरूपी तो नाही राहिली।
येवं आहे नाही हे बोली। माया जाण॥२८॥

अरे, आपल्या मनाच्या अनुभवकक्षेत जे जे काही येते ते सारे मायानिर्मित आहे, असत्य आहे. ते खरोखरीच असत्य आहे असा स्वतः अनुभव घ्यावा आणि मग त्याचा त्याग करावा.

मनाला भासणारे सर्व काही मायानिर्मित, खोटे आहे. खरे नाही. परमात्मस्वरूपाच्या ठिकाणी माया मुळी राहतच नाही. याप्रमाणे माया आहे व माया नाही अशी भाषा वापरावी लागते. हा देखील मायेचाच प्रकार आहे.

आपले मन सीमित, सांत व अनेकात रमणारे आहे. त्याला दृश्यात रमायला आवडते. प्रत्येक ज्ञानेंद्रिय एकाच अंगाची (चक्षु- पहाणे, श्रोत्र- ऐकणे) माहिती आत घेऊन येते. ही माहिती सदोष, अपुरी असते. त्यात मन स्वतः भर घालते, कल्पना करते. अशा रीतीने प्रत्येक माणूस प्रत्यक्ष जगावर आधारलेले स्वतःचे एक खाजगी व मानसिक प्रतिमामय जग तयार करतो. ते खरे नसते. त्याचा त्याग करायला हवा. अशा मनःकल्पित दृश्य जगाच्या त्यागालाच दृश्यविलय म्हणतात.

मुख्य अवस्था दोन आहेत. एकात स्वरूपाचा अनुभव आहे तर एकात स्वरूपाचा अनुभव नाही. जिथे स्वरूपाचा अनुभव असतो तिथे मायेचा मागमूस नसतो. परंतु तिथे माया नाही हे सांगणारा मी शिल्लक नसतो. त्यामुळे तिथे माया संभवत नाही. दुसऱ्या अवस्थेत दृश्य खरेपणाने भासते. परंतु संत त्यांना समजावून सांगताना, मायेबद्दल बोलताना मायेच्या कक्षेत येऊनच सांगतात. कारण बोलणे हे द्वैत आहे म्हणून माया आहे म्हणा किंवा नाही म्हणा, तो मायेचाच प्रकार आहे.

© www.maharaghuveer.com

अखंड अनुसंधान ठेवण्यासारखे एकच आत्मतत्त्व आहे. बाकी सारे अशाश्वत आहे. अशाश्वताच्या चिंतनाने केवळ दुःख वाट्याला येते. परमार्थाचे दुःखाशी वाकडे आहे. परमार्थात केवळ आनंद आहे. तुकाराममहाराजांजवळ काही नसताना ते आनंदाच्या डोहात डुबत होते. हे कसे काय?

आम्ही सदैव सुडके। जवळी येता चोर धाके।

दरिद्री असणाऱ्या ~~आ~~ तुकोबांना चोर घाबरतो.

जैसी स्थिती आहे तैशापरी राहे।

कौतुक तू पाहे संचिताचे।

19 SUNDAY

नवल वर्तले गे माये उजळला प्रकाशु।

मनाचिये अंधाराचा होतसे विनाशु॥

© www.madhaveeraghuveer.com

येवं सांगतो ते ऐकावे। माईक मायेने जाणावे।
आता मनन करावे। सावध होऊनी॥२९॥
मायेकरिता माया दिसे। मायेकरिता माया नासे।
मायेकरिता लाभ असे। परमार्थस्वरूपाचा॥३०॥

मी सांगतो ते नीट ऐकून घे. दृश्य मायिक आहे हे अशा रीतीने मायेनेच जाणून घ्यावे. एकाग्र मनाने याबद्दल विचार करावा.

मायेच्या प्रभावाने हे दृश्य जग भासते. पण तिच्यामुळेच दृश्य जगाचा निरास पण होतो. मायेच्या सहाय्यानेच आत्मस्वरूपाच्या अनुभवाचा मार्ग लाभतो.

माणसाला त्याच्या अज्ञानाची जाणिव असते. म्हणजेच त्याच्या अज्ञानाला ज्ञानाची पार्श्वभूमी आहे. आत्मानात्मविवेकाने स्वरूपानुभवाच्या आड येणारी माया दूर सारता येते. हे कळते आणि मग त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग तो शोधतो. असा विवेक हेच मनन आहे.

या विश्वाच्या पसाऱ्यात माणूस बिंदूमात्र आहे. चेतन व अचेतन अशा प्रचंड शक्ती म्हणजे त्या मूळ अव्यक्त शक्तीची व्यक्त रूपे आहेत. ही माया ईश्वराची चित्शक्ती असल्याने त्याच्यासारखीच ती देखील अमूर्त, असीम, अनंत आणि ज्ञानमय आहे. जगात घडणारी प्रत्येक घटना या दिव्य शक्तीच्या सामर्थ्याने घडून येते.

अल्पज्ञ, अल्पशक्ती, सांत व सीमित मनुष्य क्षुद्र देहभोगात रस घेत असतो परंतु सामान्य माणसाच्या सामान्य जीवनात सुद्धा चित्शक्तीचे अपार सामर्थ्य कार्य करते. आणि आपले जीवन चालवणाऱ्या त्या चित्शक्तीचे सामर्थ्य लक्षात आले की त्याचा परमार्थ फळाला येऊ लागतो. ही चित्शक्तीची जाणिव मीपणा क्षीण करते. त्यातूनच स्वरूपानुभूतीचा उदय होतो. ही शक्ती म्हणजेच शारदा।

© www.madhaveeraghuveer.com

माया भवसिंधूचे तारू। माया पाववी पैलपारू।
मायेवीण उद्धारू। प्राणियांस नाही॥३१॥
मायेकरिता देव आणि भक्त। मायेकरिता ज्ञाते विरक्त।
मायेकरिता जीवन्मुक्त। होती स्वानुभवे॥३२॥

माया म्हणजे संसारसागरातून पलीकडील तीरावर नेणारी होडी आहे. मायेवाचून अज्ञान नाहीसे होत नाही.

मायेमुळे देव आणि भक्त यांचा संबंध निर्माण होतो. मायेमुळे ज्ञानी पुरुष वासनाशून्य बनतात. आणि मायेमुळेच स्वरूप साक्षात्कार घडून जीवन्मुक्त होतात.

मानवी जीवनातील प्रत्येक गोष्ट बदलत असते. शरीर, मन, बुद्धी, परिस्थिती बदलत असतात. अस्थिर गोष्टीत समाधान नसते. स्वरूपात स्थिर झाले तरच समाधान मिळते. आणि हे आत्मपदी स्थिर करण्याचे काम माया करते. केवळ ज्ञानरूपिणी मायाच अज्ञान नाहीसे करू शकते.

वास्तविक मायेचे क्षेत्र हे अनेकपणाचे वा द्वैताचे आहे. त्यामध्ये स्वरूपाची विस्मृती घडते. द्वैत जीवाला आत्म्यापासून दूर नेते. वासना व आसक्तीच्या कचाट्यात सापडलेला जीव त्यात अडकत जातो. इच्छा असूनही तो यशस्वी प्रतिकार करू शकत नाही. मात्र आत्मज्ञानापर्यंत पोहोचवण्यासाठी मायाच त्याला सामर्थ्य देते. ज्ञानक्रियेचा बहिर्मुख प्रवाह परतवून ज्ञात्याचे ज्ञान करून देण्याचा चमत्कार माया करते. ज्ञाता ज्ञेयाशी तद्रूप होत असल्याने ते ज्ञान अखंड निश्चित व उत्कृष्ट असते याला आत्मानुभव म्हणतात. इथेच जीव जिवंतपणी मुक्तीचा आनंद भोगतो. समर्थ इथे मायेची स्तुती करतात.

सर्व साधने मायिक असली तरी प्रत्येक साधन म्हणजे Systeme आहे. Know the systeme. Use the systeme. Get the result's and Forget the systeme. श्रद्धावान् लभते ज्ञानम्।



© www.madhaveeraghuveer.com

Systeme वर श्रद्धा ठेवायची. संतांना जसा त्याचा उपयोग झाला, त्यांना यश मिळालं तसंच मलाही मिळावं म्हणून Systeme वापरायची पण नंतर तीही सोडून द्यायची आहे - साध्य होता साधनाचा ठाव नाही।

हिशेब झाला मायेचा। झाला निवाडा तत्त्वांचा।

नाटक-सिनेमा पहाणे म्हणजे मायेत गुंतणे असले तरी देवधर्म - तीर्थयात्रा - जपध्यान ही देखील मायाच आहे. त्यातही गुंतायचे नाही.

एक एक दालन पार करत मायेचे महाद्वार ओलांडायचे

भोजन व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, न्यायव्यवस्था, राज्य / शासन व्यवस्था / कुटुंब व्यवस्था

Departments / De centralization.

पुन्हा केंद्राकडे / उगमाकडे जायचे आहे.

Ellimination करत गेले तर शेवटी उरते ती पोकळी / अवकाश

तत्त्वझाडा करत करत त्या जगन्नियंत्यापर्यंत पोहोचायचे आहे. शेकडो साक्षात्कार - मायिक एक-एक करत दूर करायचे.

© www.madhaveeraghuveer.com

धरी कामधेनू पुढे ताक मागे ।

मायेकरिता वेदश्रुती । मायेकरिता नाना व्युत्पत्ती ।
मायेकरिता होती । मूढ ते विवेकी ॥३३॥
माया परमार्थाचे अंजन । मायेकरिता जोडे निधान ।
मायेकरिता सावधान । साधक स्वरूपी ॥३४॥

माया वेद आणि उपनिषदे निर्माण करते. मायेच्या सत्तेने निरनिराळ्या प्रकारची विद्वत्ता प्रगटते. मायेच्या सहाय्यानेच मूर्ख प्रमादशील व्यक्ति सुद्धा विवेकवान बनतात.

माया म्हणजे परमार्थ दाखवणारे अंजन आहे. माया आपला ठेवा मिळवून देते. मायेमुळे साधक स्वतःचे स्वरूपानुसंधान सांभाळतो.

पूर्वी ऋषी-मुनी एकांतवासात, अरण्यवासात सूक्ष्म चिंतन करत. त्यातून प्राप्त होणाऱ्या समाधि अवस्थेमध्ये त्यांना विश्वरचनेसंबंधी आणि ईश्वरस्वरूपविषयक गूढ आणि उच्च विचार उलगडून येत. त्याच विचारांचा संग्रह वेद-उपनिषदांत आहे. विचारांचे हे स्फुरण सुद्धा मायेमुळेच होते. बुद्धीच्या जोडीला धारणाशक्ती असल्याशिवाय कोणत्याही ज्ञानशाखेचे सखोल ज्ञान होत नाही. दृश्यात बदल करणे सोपे परंतु अंतरंगात बदल करणे कठीण आहे. परंतु मायेचे सामर्थ्य असे आहे की ती मूर्खांच्या अंतःकरणात मोठा बदल घडवून आणते आणि त्याला आत्मानात्मविवेकी बनवते.

जमिनीत पुरलेले गुप्त धन दिसण्यासाठी डोळ्यांमध्ये विशिष्ट अंजन घालावे लागते. परमार्थ देखील गूढ, सूक्ष्म व अतींद्रिय आहे. स्वानंदाचा ठेवा आपल्या मालकीचा असून आज आपल्या हातात नाही. हा ठेवा माया आपल्या स्वाधीन करते. विस्मृत झालेल्या आत्म्याची स्मृति करून देणे हेच ज्ञान आहे. परंतु विस्मृतीचा जोर जबरदस्त असतो. तिला बाजूला सारण्यासाठी दक्षता व एकाग्रता लागते.

JUNE SATURDAY 25



| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

Supply करणारी माया.

~~रस्सीखेच~~

त्यामध्ये फार ताण असतो. तो सहन करण्यासाठी जीवाची शक्ती कमी पडते. तिथे मायाच पुष्कळ शक्ती पुरवते व स्वरूपानुसंधान टिकवून ठेवते.

नाम हे एक साधन आहे. ते फार काळ टिकत नाही. मात्र नामी मात्र सत्य, शाश्वत, चिरंतन आहे. ∴ नामामध्येच नामीला गुंफायचे. असे करत गेले तर साधक नामीशी एकरूप होतो. इतका एकरूप की तो नामसुद्धा विसरून जातो. माळेवर जप करता करता इतके तल्लीन व्हावे की माळसुद्धा गळून पडते.

जेव्हा नाम घेणारा नामाच्या माध्यमातून नामीशी एकरूप होतो म्हणजेच जीव जेव्हा आत्मरूप होतो तेव्हा साधन गळून पडते. आणि ते योग्यच आहे. कारण शेवटी साधन हे मिथ्या आहे.

ही नववी आत्मनिवेदन भक्ती आहे. ही सिद्ध झाल्याशिवाय भक्तीचे वैभव प्राप्त होत नाही. ज्या क्षणी आत्मनिवेदन होतं त्या क्षणी नाम गळून पडतं.

नाम गळून पडणं हे भूषणास्पद आहे.

© www.madhaveeradhuveer.com

26 SUNDAY

मायेकरितां स्वहित घडे। मायेकरितां भ्रांति उडे।
मायेकरितां बिघडे। प्रपंचभान ॥३५॥
मायेविण ज्ञान कैंचे। माया जीवन सकळ जीवांचे।
मायेविण साधकाचे। कार्य न चले ॥३६॥

मायेमुळे आत्मकल्याण घडून येते. मायेच्या सामर्थ्याने मिथ्या ज्ञान नाहीसे होते. मायाच दृश्य जगाची प्रतीती नाश करते.

मायेशिवाय माणसाला ज्ञान होणे शक्य नाही. सर्व जीव मायेच्या चित्‌शक्तीने जिवंत राहतात. मायेच्या मदतीवाचून साधकाची साधना चालू शकत नाही.

ऐहिक सुखोपभोगामध्ये माणूस आपले कल्याण मानतो आत्म्याकडे त्याचे लक्षच जात नाही. त्यामुळे त्याला अखेर असफलता पदरी पडते. माया त्याचे लक्ष आत्मस्वरूपाकडे वळवते. जगाबद्दल / जीवनाबद्दल असलेले त्याचे गैरसमज दूर करते. प्रपंचाच्या अनुसंधानात असलेले त्याचे मन अलगदपणे बाहेर काढते.

बुद्धी ही स्वतः जड आहे. तिच्यामध्ये चैतन्याचे प्रतिबिंब पडल्यामुळे ती ज्ञान मिळवू शकते. परंतु ते प्रतिबिंब कितपत स्वच्छ पडावे हे मायेच्या स्वाधीन आहे. माया ही ईश्वराची चित्‌शक्ती आहे. चैतन्यामुळेच प्राणी जिवंत राहतात. वृत्ती या स्वाभाविकपणे बाहेर धावतात. त्यांना आत वळवून आत्मस्वरूपामध्ये स्थिर करण्यासाठी लागणारे आत्मबळ मायाच पुरवते.

© www.madhaveeradhuweer.com

योगश्चित्तवृत्तिनिरोधः

मायेवीण परमार्थ ~~?~~ जोडे । हे तरी कईच न घडे ।
मायेवीण सहसा नातुडे । गुज योगियांचे ॥३७॥
माया योगियांची माउली । जेथील तेथे नेऊनी घाली ।
कृपाळूपणे नाथिली । आपण होय ॥३८॥

मायेशिवाय परमार्थ जोडणे ही गोष्ट कधीही शक्य नाही. योगी लोकांचा मार्ग गुप्त असतो. मायेच्या मदतीशिवाय तो आकलन होणे शक्य नाही.

माया ही योग्यांची प्रेमळ माताच आहे. ज्या मूळ स्वरूपापासून योगी खाली आला त्या स्वरूपापाशी ती त्याला नेऊन सोडते. आणि योगी स्वरूपी पोहोचल्यावर मोठ्या दयाळूपणे नाहीशी होते.

जीवाची सहज प्रवृत्ती बहिर्मुख असते. परंतु त्याला ईश्वराभिमुख करून त्याच्या दर्शनाची वाटचाल करणे म्हणजे परमार्थ! यासाठी निश्चयाचे बळ लागते. ते बळ मायाच देते. योग्यांचा गुप्त मार्ग कठीण आहे. त्याचा अभ्यास करण्यासाठी लागणारे तंतुबळ मायाच देते.

माणसाची सध्याची अवस्था ही त्याची अवनत अवस्था आहे. मूळ शुद्ध व पूर्ण असलेली त्याची अवस्था लोप पावली आहे. परंतु तिथे पोहोचण्याची ओढ मात्र आहे.

माणसाचे मन हा एक तलाव आहे. त्यावर वृत्तींचे तरंग उठत असतात. तरंग उठणे थांबले की तलाव शांत होतो. शांत तलावाचा तळ दिसू शकतो. तसेच मन शांत झाले, वृत्तिशून्य झाले की आपले स्वरूप दिसू लागते. त्यासाठी प्रथम वृत्तींचा निरोध करून मग वृत्तिशून्य अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी खूप आत्मशक्ती लागते. ती आत्मशक्ती साधकाला मायाच आईच्या मायेने पुरवते. त्याला स्वरूपाशी भिडवते व स्वतः गुपचुप अंतर्धान पावते.

© www.madhaveeraghuveer.com

जीव व आत्मा यांचा वियोग झालेला आहे
भ्रमातून सोडवून त्यांचा योग घडवून आणणारी माया
आहे. ती इतकी कृपाळू आहे की हा अनुभव देताना
ती स्वतः नाहीशी होते.

अध्यात्ममार्गात दृष्टांत ~~सेतु~~ सिद्धांत समजावून
घेण्यासाठी दृष्टांत द्यावे लागतात. मात्र ते स्वतःला
उत्तम समजलेले असावेत. दुसऱ्याच्या भाषेत नसावेत.
Spoon feeding नको.

आत्मानुभव घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या साधकाला
माया साधने पुरवते म्हणून मायेच्या सहाय्यावाचून
परमार्थ घडणे अशक्य आहे. परंतु जेव्हा ब्रह्मानुभव
येतो तेव्हा त्या वेळी माया अलगद निवृत्त होते.
त्यामुळे तो अनुभव शब्दाने सांगता येत नाही.
कारण शब्द हे मायिक आहेत.

आत्मज्ञानाची साधने मायिक असतात - मुण्डक-
प्रणवो धनुः शरो हि आत्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते।
अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत् तन्मयो भवेत्॥
प्रणवाच्या माध्यमातून अंतःकरण वृत्ती आत्माकार
करण्याचा अभ्यास हे या साधनेचे स्वरूप आहे.
यातील प्रणव हा अक्षररूप व सांकेतिक आहे.
त्यामुळे तो मायिक आहे. अगदी ध्याता-ध्येय-
ध्यान ही त्रिपुटीदेखील मायिक आहे. परंतु या
साधनाशिवाय ब्रह्मानुभव घेता येत नाही.

मात्र अनुभव येत असताना माया आपणहून
नाहीशी होते व सर्वत्र ब्रह्माचाच अनुभव येतो.

ब्रह्मैवेदममृत पुरस्ताद ब्रह्म पश्चाद
ब्रह्म दक्षिणातश्चोत्तरेण मुण्डकम्॥

सकळ मायेचे स्वरूप जाले । त्यात तुसेही स्वरूप आले ।
हे इतुकेही आपुले । नको मानू सर्वथा ॥३१॥

आतापर्यंत मायेचे सर्व बाजूंनी वर्णन झाले. त्यामध्ये 'तू कसा आहेस' याचेही वर्णन येऊन गेले. हे सारच्या सारे मुळीच आपले मानू नकोस.

शिष्याचा मूळ प्रश्न होता की नाशिवंत सर्व टाकावे असे आपण सांगता ते नाशिवंत आहे तरी काय? त्यावर उत्तर देताना माया या संकल्पनेचा एवढा विस्तार करावा लागला.

सर्वच दृश्य गोष्टींच्या अंतरी ईश्वराची असीम, अमूर्त व ज्ञानमय शक्ती काम करते. ईश्वराची सत्ता असलेली ही मायाच ईश्वरदर्शनासाठी जीवाला सामर्थ्य पुरवते. पण तिला स्थिरता नाही. ती चल आहे, गतिमान आहे. या भवसागराचे मूळ आहे. सतत ती बदलत असते. तिला असणे रुचत नाही. बदलणे आवडते. घडामोडी करायला आवडतात. म्हणून स्वस्वरूपात स्थिर होण्यासाठी तिची मदत घ्यायची पण तिच्यात अडकायचे नाही. तिला सोडून द्यायचे.

वेदांतशास्त्रात माया ही स्वाश्रया आहे असे म्हटले जाते. ती स्वतःच्या अधिष्ठानावर म्हणजे ब्रह्माच्या आश्रयाने राहते.

मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ॥

जे काही आहे ते सर्व ब्रह्मावर अधिष्ठित आहे. त्याच्या खेरीज कोणाचेही काहीही चालत नाही.

भयादस्याग्निस्तपति भयात्तपति सूर्यः ।
भयादिन्द्रश्च वायुश्च मृत्युर्धावति पञ्चमः ॥
(कठ. २.६.३)



© www.madhaveeraghuveer.com

सर्वच संग द्वैतात्मक, भेदयुक्त, त्रिपुटीयुक्त, बंधरूप व मायिक असतो. संगाचा अनुभव अज्ञानामुळे येतो. साधनकाळी निःसंग हा शब्द स्वीकारावा लागतो. परंतु अनुभवानंतर तो शब्द निरर्थक ठरतो. म्हणून संग व असंगाच्या पलीकडे असणारे ब्रह्मस्वरूप होऊन रहा.

संग निःसंग, सत असत, बंध मुक्ति सत वर उभे केलेले असत जेव्हा कल्पित ठरते तेव्हा त्यासंबंधी विचार करण्याचे काही कारणच नाही.

अधिष्ठानावर अध्यस्त भासते. रज्जुवर सर्पाचा, शिंपल्यावर चांदीचा भास होतो. ते सत्य असल्यासारखे भासते. त्याचा संग टाकला की अधिष्ठानाचा अनुभव येतोच येतो. आणि आत्मा हेच अधिष्ठान असल्याने त्याच्याशी निःसंग होण्याचा प्रश्नच येत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

03 SUNDAY

आता सांगतो तुज खूण। तुवा नाशिवंत केले मदर्पण।
आता करिसी आळकेपण। तरी मज शब्द नाही॥४०॥
संग तितुका नाशिवंत। निःसंग शब्द अशाश्वत।
म्हणोनि संगनिःसंगातीत। होऊन राहे॥४१॥

स्वामी शिष्याला म्हणतात, 'जे नाशिवंत आहे ते मला देऊन टाकले आहेस. त्याची जर अभिलाषा धरशील तर मात्र मला बोल लावू नकोस. दोष देऊ नको.

आसक्तीचा संबंध नाशिवंत असतो. अनासक्त हा शब्द आहे. तोही नाशिवंत आहे म्हणून आसक्ती व अनासक्ती यांच्या पलीकडे जाऊन राहणे आवश्यक आहे.

दृश्य नाशिवंताची मुळे आपल्यात खोलवर गेलेली असतात. जीव त्यात गुंतला असतो. त्यामुळे भावनेच्या भरात जरी शिष्याने सर्व नाशिवंत दिले असले तरी ते पूर्णपणे मुळापासून गेलेले नाही. त्या वासनेचे बीज अजून शिल्लक आहे आणि त्यामुळेच शिष्याला स्वरूपानुभव येत नाही. त्यामुळे त्याचा दोष सद्गुरूकडे येत नाही. दृश्याचे प्रेम समूळ गेले पाहिजे.

आळकेपण - कुचराई / चालढकल

मिथ्या - असत्य - मायिक - नाशिवंत - असार

या सर्वांचा संग पूर्णपणे टाकायचा. अशेष--- थोडाही शिल्लक नको.

ऋण - अग्नि - व्याधी - संपूर्णपणे संपवावे---

किंचित संग देखील मोक्षाच्या आड येतो.

पाणी १००% ला उकळते. ९९°ला नाही.

आता पुढील निरूपण। आदरे करावे श्रवण।
संगातीत होईजेल ती खूण। सांगिजेल पुढे॥४२॥
इति श्री आत्माराम। रामदासी विश्रामधाम।
योगी पावती विश्राम। जये ठाई॥४३॥

आपल्याला आवडणाऱ्या व खऱ्या वाटणाऱ्या वस्तूला आपण मनाने चिकटतो. तोच संग वा आसक्ती। या वस्तू नाशिवंत आणि मनाचे चिकटणे देखील नाशिवंत। एखाद्या वस्तूपासून मन सुटले की तेवढ्यापुरता व त्या वस्तूपुरता तो निःसंग होतो. संग जडतो तोही मीपणाने। आणि मीपणा तर नाशिवंत आहे. थोडक्यात, संग काय वा निःसंग काय दोन्ही नाशिवंतच आहेत. या दोन्हींच्या पलीकडे गेले तरच स्वरूपानुभव येतो.

आसक्तीचा संबंध नाशिवंत असतो. अनासक्त हा शब्द आहे व तोही नाशिवंतच आहे, म्हणून आसक्ती- अनासक्तीच्या पलीकडे जायला हवे.

आसक्त माणसाला अनासक्तपणा समजतो. पण दोन्हीच्या पलीकडील अवस्था समजणे कठीण जाते. सद्गुरु ती समजावून सांगतात.

असा हा आत्माराम रामदासांचे विश्रांतिस्थान आहे. या ठिकाणी योग्यांना पण विश्रांति लाभेल.

© www.madhuraveeraghuveer.com

नवल उदेला चंडांशु
मावळतीरहे विश्वभानु ॥



॥श्रीराम॥

पाच समासांचे एकमेकाशी नाते---
त्याग - काढून टाकणे
माया - मायिक गोष्टी
ब्रह्म - मायेचे अधिष्ठान -

अधिष्ठान, अध्यस्त, अध्यास

वाळवंटी नापिकली जमीन, वरून कडक ऊन असते तेव्हा मृगजळाचा भास होतो - त्याला अध्यास म्हणतात.

माळजमीन हे अधिष्ठान —— रज्जु, शुक्ति
पाणी हे अध्यस्त —— सर्प, रजत.

मग हे दृश्य जर मिथ्या (आभास) असेल तर तो अध्यास कोणत्या अधिष्ठानावर झाला हे समजून घ्यायला पाहिजे. ते आहे ब्रह्म आणि प्रपंच ठिकाणी आसक्ती ठेवून उपयोगाचे नाही. आसक्ती संपली की प्रपंचही संपला त्यासाठी ब्रह्म जाणून घ्यायचे. ब्रह्म जाणले की माया उरतच नाही. ज्याला उत्पत्ति स्थिति लय आहे ते सर्व मिथ्या (मायिक) आहे

घर - ज्या दिवशी बांधले ती उत्पत्ति
आता ते घर अस्तित्वात आहे ती स्थिती
परंतु काही वर्षांनी पडझड होऊन ते नष्ट होईल - लय.
त्यामुळे याच न्यायाने सर्व काही संपणार आहे.

वर्धमान ते ते जाते मार्ग रे क्षयाला
तरीदेखील आपण त्याच्याशी बांधीलकी मानतो. ती Identity समजतो. अशा मायिक Identity ला धरून ठेवण्यात दुःख आहे.

© www.madhaveeraghuveer.com

२० जुलै २०१६

## ३. ब्रह्म निरुपण (उद्धओव्या)

संग नितुका नाशिवेत । सांडून राहावे निवांत ।
येकपणाचीही अंत । जालियो समाधान ॥ ६ ॥

सर्व प्रकारची आसक्ती नाशिवेत आहे. तिचा त्याग करावे आणि शांत राहावे. पुढे एकटेपणाचाही शेवट झाला म्हणजे समाधान लाभते. एकांत - (एकाचा अंत) मी आणि माझे यातच सामान्य माणूस अडकतो. त्याचे चित्त दृश्य वस्तुला चिकटले असल्याने तो नेहमी द्वैतातच रमतो. परंतु हळूहळू अनुभवाने, विवेकाने, सद्गुरु उपदेशाने दृश्य जग हे विनाशी आहे हे समजू लागले की आसक्ती थोडी कमी होते. संबंध तुटू लागतात. मग तो एकला एकच उरतो. दृश्य दूर सरले की द्वैत लय पावते. द्वैताचा लय झाला की जीव प्रथम शांत व खऱ्या अर्थाने स्वस्थ होतो. याला Inner Quiet म्हणतात. पण हीदेखील एक अवस्था आहे. जीव एकला असला तरी मीपणा शिल्लक राहतो. या 'मी'चा शेवट झाला की मग संपूर्ण समाधान लाभते.

To find inner happiness is difficult
But to find happiness outside is impossible.

परि संग सोडोनि सुखे रहावे ।
असे पालुपद असणारे ८ श्लोक मनोबोधात आहेत.
संग म्हणजे आसक्ती ! ती सुटतच नाही, तर ती मायाजन्य आहे. म्हणून ती सोडून देऊन एकपणाचा अनुभव घ्यायचा आहे. विरघळून जायचे आहे.
लिंबू, मीठ, साखर, पाणी यांनी आपला मीपणा
ब्रह्मण्याधाय कर्माणि
कायेन मनसा बुद्ध्या ---



© www.madhaveeraghuveer.com

JULY SATURDAY 16



सोडला तरच त्यापासून मधुर सरबत बनते.

एकपणाचाही अंत व्हायला हवा. मारुतीला कोळलेला शेंदूर एकरूप झाल्यासारखा वाटतो. परंतु प्रत्यक्ष तसा होत नाही. दुधात साखर विरघळावी तशी एकरूपता हवी. ती गाळली तरी काढता येत नाही

माझी Identity एकच आहे मी आत्मा आहे. सत्य आहे, अरूप आहे. ~~मा~~ मला जन्म/मरण नाहि वाढदिवस / श्राद्ध हे देहाचे आहेत.

असंगशस्त्रेण दृढेन छित्वा।

असंगत्वाचे शस्त्र हातात घेऊन हा संसारवृक्ष निश्चयपूर्वक छाटायचा. म्हणजेच 'तो सत्य नाही' याचे सतत भान असावे. माझा देहही सत्य नाही. कायम टिकणारा नाही. परंतु 'मी' मात्र शाश्वत आहे. हा 'मी' देखील विरघळून जायला हवा. परंतु देहबुद्धी फार प्रबळ आहे. ती जाता जात नाही. खरं तर त्याचा अनुभव घ्यायचा त्यात हरवून हरवून जायला हवं. Selfie - Tulips, Eiffel Tower

17 SUNDAY ताजमहाल, Grand Canion, अजिंठा वेरूळ, लंडन Madam Tussaud -

अनुभव सोडिता ते आपणचि होईजे।



© www.madhaveeraghuveer.com

येकपणाचा उमस। काढिता त्रिपुटी सावकास
होत आहे म्हणोनि ध्यास। येकपणाचा नसे॥२॥

मी एकच आहे हे स्फुरण नाहीसे करण्याच्या प्रयत्नात त्रिपुटी उगम पावते म्हणून एकटेपणाचेही सतत चिंतन नसावे.

आसक्तीच्या दृष्टीने तीन अवस्था असतात.
१. आसक्ती ठेवणारा मी
२. आसक्ती असते ती वस्तु
३. आसक्ती ठेवण्याची क्रिया

अनासक्तीमध्ये निःसंगता असल्याने तिथे द्वैत अव्यक्तपणाने असते. मी निःसंग आहे यात अहंचे स्फुरण आहेच. त्यामध्ये तूचे सुप्त भान असते.

मला आसक्ती नाही या जाणिवेत मी आहे, वस्तु आहेत आणि आसक्ती नसण्याची क्रिया सुद्धा आहे. शेवटी ही सुद्धा त्रिपुटीच आहे.

या त्रिपुटीमुळे साधक स्वस्वरूपापासून दूर जातो. म्हणून मी निःसंग आहे याचे सुद्धा सतत चिंतन नसावे.

उमस - आवेग, स्फूर्ति

एकची जाणीव झाली की दोन आलेच.

तुझे नि माझे जमेना परि तुझ्यावाचून करमेना।
दुसरा आला की त्रास आलाच।

एकपणाचाही ध्यास नको. मी अनासक्त आहे या अवस्थेतही त्रिपुटी आहेच. त्यामुळे मी अनासक्त असंग आहे याचेही चिंतन सारखे नको.

© www.madhaveeraghuveer.com

JULY
TUESDAY 19

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

सूक्ष्म अंतःकरण वृत्ती आत्माकार झाली तर सुस्वरूपता येते.

मीच नदी, मीच विठ्ठल, मीच देऊळ पांडुरंगाची मूर्ती पाहता पाहता डोळ्यातील बाहुली देखील पांडुरंगच होते.

तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल। देव विठ्ठल, देवपूजा विठ्ठल

जेवताना जेवावं — T.V. नको.
चहा पिताना मनापासून प्यावा. — पेपरवाचन नको.
असं केलं तर ध्यानाच्या वेळी ध्यान लागेल.
इतर विचार मनात येणारच नाहीत.
ही सवय Cultivate करायला हवी.
नाम जपताना मी नामसाधक, जपसंख्या इत्यादी विचार मनात नको. भाव गळून पडल्याचे भान नाही असा नामसाधक सिद्ध झालेला असतो.
जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य सिद्धीला जाणे हीच खरी सिद्धी।

© www.madhavveeraghuveer.com

तो मी आत्मा ऐसा हेतु। हे नाशिवंत टाकी तू।
उन्मनी अवस्थेचा प्रांतु। ते स्वरूप तुझे॥३॥

'अहमात्मा' 'अहं ब्रह्म अस्मि' ही शुद्ध जाणिवसुद्धा नाशिवंत आहे. म्हणून तू ती सोडली पाहिजेस. जेथे साऱ्या वृत्तीसह मन विलीन होते ती उन्मनी अवस्था हे तुझे खरे स्वरूप समजावे.

देहबुद्धीमध्ये 'मी देह आहे' ही अशुद्ध, सीमित व सांत अशी जाणिव आहे. जागृती, स्वप्न, सुषुप्ति या अज्ञानमय अवस्थांमध्ये ही जाणिव असते. तिथे संग आहे, आसक्ती आहे.

आत्मबुद्धीमध्ये मात्र 'मी आत्मा आहे' अशी शुद्ध, असीम, अनंत जाणिव असते. तिथे निःसंगता अनासक्ती असते. आत्मबुद्धीची ज्ञानमय तुरीय अवस्था ही सुद्धा वृत्तीने व्याप्त आहेच.

देहबुद्धी व आत्मबुद्धी या दोन्ही वृत्तीच आहेत.

देहबुद्धीमध्ये मन देहाला व्यापून असते, तर आत्मबुद्धीमध्ये मन विश्वाला व्यापून राहते. अखेर विश्वमन देखील विलीन होऊन उन्मनी अवस्थेत जायला हवे. तिथे केवळ स्वस्वरूप अनुभवाला येते.

'मी आत्मा' हे जाणवणे सुद्धा द्वैत आहे. कारण यातही 'मी आहे' मग 'आत्मा आहे' आणि नंतर 'त्या दोन्हींचे ऐक्य आहे' यात देखील तीन गोष्टी येतात. त्रिपुटी आली. जर मी आत्माच आहे, तर मग 'मी आत्मा' 'मी आत्मा' असे म्हणण्याचे कारणच नाही. 'मी आहे' 'मी आहे' असे कधी सांगावे लागते का? कोणीतरी जर मला 'तू नाहीस' असे म्हटले तर मग 'मी आहे' असे आवर्जून सांगावे लागेल. गृहीत गोष्टी वारंवार सांगण्याची गरज नसते



© www.madhaveeraghuveer.com

JULY THURSDAY 21



विचार करण्याची जी शक्ती आहे, ते सोडून जेव्हा मन वर जाते तेव्हा त्याला उन्मन म्हणतात. ही श्रेष्ठ अवस्था आहे. खरं तर ती समाधिच आहे.

श्री समर्थ — लुगडे नेसले - देहभाव विराला
श्री गजानन महाराज - दिगंबर अवस्था
योगी अरविंद - निर्विचार स्थिती.

मन पिसाप्रमाणे हलके होते. ऊर्ध्वगतीला जाते. त्याला देहबोधावर आणणे कठीण जाते.

© www.madhaveeraghuveer.com

ऐसा जो अनुभव जाला। तोही नाशिवंतामध्ये आला।
अनुभवावेगळा राहिला। तो तू आत्मा॥ना॥
हेही न घडे बोलणे। आता वाऱ्हेरा किती देणे।
वेद शास्त्रे पुराणे। तेही नासोनी जाती॥ ५॥

उन्मनीचा अनुभवसुद्धा नाशिवंताच्या कक्षेत येतो. तो अनुभव विरून सर्व प्रकारच्या अनुभवांच्या पलीकडे असणारा जो आत्मा तो तू आहेस.

"सर्व अनुभवातीत असा जो आत्मा तो तूच आहेस" हे बोलणे देखील खरे नाही. त्या आत्म्याबद्दल आणखी किती पाल्हाळ करावे? वेद शास्त्रे पुराणे देखील तिथे पराभूत होतात.

मानवी जीवनाचे क्षेत्र हे अनुभवांनी भरलेले असते. कनिष्ठ पातळीवरील अनुभवांमध्ये अनुभव घेणारा मी हा अनुभव घ्यायच्या वस्तुपासून निराळा असतो. श्रेष्ठ पातळीवर मात्र अनुभव घेणारा हा त्या वस्तुशी एकरूप होतो. तिच्याशी तादात्म्य पावतो. उत्कृष्ट अनुभवाची पातळी अत्यंत सूक्ष्म असते. त्या अनुभवामध्ये अनुभव घेणारा मी उरत नाही व वस्तुही उरत नाही. पण ही दोन्ही नाहीत असा अनुभव मात्र रहातो. परमात्म्यावर ही अनुभवाची मर्यादा सुद्धा लादणे योग्य नाही. अनुभवरहित जे आत्मस्वरूप तेच आपले खरे रूप आहे.

गुरूकडून अध्यात्म श्रवण करण्यासाठी भाषा हेच माध्यम असते. कनिष्ठ अनुभवापासून श्रेष्ठ अनुभवापर्यंत भाषेचा अंमल चालतो, त्याच्यानंतर ती लटकी पडते शब्द केविलवाणे होतात. असे होणे स्वाभाविक आहे. वेद शास्त्रे, पुराणे लिहिणाऱ्यां ऋषींचे शब्दप्रभुत्व अपार असूनही आत्मस्वरूपाचे वर्णन करताना त्यांनी हार मानली.

© www.madhaveeraghuveer.com

'अनुभव घेतो' असे वाटणे हे सुध्दा ~~केल्याचे~~ चेताचे कल्पन आहे. 'गाढ झोप येणे' यात जे अद्भुत सुख आहे ते दुसऱ्या कशातही नाही. कारण त्या वेळी मी झोप घेतो हेही जाणवत नाही. इतके ते निरुपद्रवी आहे. ते इतके कोमल आहे की त्याचा स्पर्शही जाणवत नाही आणि सुख दिल्याशिवाय ते रहात नाही. ब्रह्मानंदाचे नमुनेच आहे.

∴ तर निद्रासुखाला ब्रह्मानंदसहोदर असे म्हटले जाते. या अनुभवावेळी जो असतो तोच आत्मा

||दासबोध||

तुज वाटे ही जागृती | मज आली अनुभवप्राप्ती |
या नाव केवळ भ्रान्ती | फिटलीच नाही ||

यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः |
अविज्ञातं विजानतां विज्ञातं अविजानताम् ||

शुद्धचैतन्यरूपोऽहं आत्मारामोऽहमेव |
अखण्डानन्दरूपोऽहं अहमेवाहमव्ययः ||

24 SUNDAY



© www.madhaveeraghuveer.com

ग्रंथमात्र जितुका बोलिला। आत्मा त्यावेगळा राहिला। ये मायेचा स्पर्श जाला। नाहीच तयासी।। ह्या स्वरूप निर्मळ आणि निघोट। स्वरूप सेवटचा सेवट। जिकडे पहावे तिकडे नीट। सन्मुखचि आहे।।७।।

सर्व अध्यात्मग्रंथ त्या आत्म्याचे पुष्कळ वर्णन करतात. पण आत्मा त्या वर्णनाच्या पलीकडे राहतो. बरोबरच आहे. कारण त्या आत्मस्वरूपाला मायेचा स्पर्श होऊच शकत नाही. आणि भाषा मायेच्या कक्षेमध्ये येते.

आत्मस्वरूपाला वासनारूपी मळाचा स्पर्श नसतो. ते सर्व ठिकाणी गच्च भरलेले आहे. ते सर्वांचे अंतिम स्थान आहे. जिकडे पहावे तिकडे ते शेवटपर्यंत पसरलेले आहे. त्यामुळे ते सर्व बाजूंना समोर असते.

आत्मवस्तु जशी अनंत व निःशब्द आहे, तसाच तिचा अनुभव आहे. अनुभवात येणारी प्रचीती मायेच्या सांत व शब्दमय पातळीवर करावी लागते. आणि अध्यात्मग्रंथामध्ये केलेले आत्मवर्णन कधीच संपूर्ण नसते. ते अपुरे सांत व सीमितच असणार. त्यामुळे त्यातून निघणारा अर्थ आत्म्यापर्यंत पोहोचू शकत नाही.

आत्मस्वरूप म्हणजेच परमात्मस्वरूप. ते अमूर्त अनंत व असीम आहे. त्यामुळे माणसाच्या सांत व सीमित बुद्धीला त्याचे आकलन होऊ शकत नाही. आणि साक्षात्कारी पुरुषांना त्याचा प्रत्यक्ष परिचय होत असला तरी ते शब्दात मांडता येत नाही. त्यामुळे त्यांच्या अनुभव चौकटीतील जे ज्ञान ते आपल्यासमोर ठेवतात त्यावरून आपण स्वस्वरूपाची कल्पना करून अंदाज बांधतो. परंतु ते अपुरेच आहेत.

© www.madhaveeraghunee.com

आत्मस्वरूप कसे आहे?

१. ते पूर्ण असल्याने शुद्ध व पवित्र आहे. अपूर्णतेत जो अशुद्धपणा मळ असतो तो तिथे नावाला देखील नाही.

२. ते सद्रूप आहे. ते नाही अशी अवस्थाच नाही. ते असतेच असते. त्याहून अन्य काही नाहीच. ते सर्वत्र घनदाट भरले आहे.

३. सर्वच दृश्य वस्तु अव्यक्तातून व्यक्तात येतात. काही काळ राहतात व पुन्हा अव्यक्तात विलीन होतात. या अव्यक्ताचाही विलय शेवटी स्वरूपात होतो.

४. आपण स्थळकाळाच्या चौकटीत जगतो. त्याला मात्र कोणतीच चौकट नाही. जिकडे पहावे तिकडे अनंतापर्यंत, अनंत काळापर्यंत ते पसरलेले आहे.

५. आणि म्हणूनच कुठेही पहा ते आपल्या समोर आहेच. डावी उजवी बाजू, वर खाली, मागे पुढे सर्वत्र ते आहेच आहे.

नमः पुरस्तात् अथ पृष्ठतस्ते
नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व।
अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं
त्वमादिदेवः पुरुषः पुराणः॥

मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश।
माझ्याकडे देव माझा पाहतो आहे॥

त्याचे पाहणे आणि न पाहणे हे दोन्ही एकमेकाला छेद देऊन नाहीसे होतात.

तदेजति तन्नैजति तद्दूरे तद्वन्तिके।
तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्य बाह्यतः।



जे बहु दुरीचा दुरी। जे निकटाचे जवळी अंतरी।
दुरी आणि अभ्यांतरी। संदेहाचे नाही॥८॥
जे सकळांपरिस मोठे। जेथे हे सकळही आटे।
अकस्मात येकसरे तुटे। मूळ मायेचे॥९॥

आत्मस्वरूप अत्यंत दूर आणि तितकेच जवळ आहे. ते आपल्या आतही आहे आणि बाहेरही आहे.

आत्मस्वरूप सर्वांहून मोठे आहे. तिच्या ठिकाणी सारे विश्व अंतर्धान पावते. या कारणाने मायेचे मूळच एका क्षणात उपटले जाते.

प्रत्येक ज्ञानशाखेमध्ये एखाद्या वस्तुसमूहाचे ज्ञान करून घेतले जाते. त्यासाठी विशिष्ट परिभाषा Terminology वापरतात. अर्थात त्यांचे अर्थ संदर्भानुसार बदलू शकतात. उदा० प्रकृति – वैद्यक, सांख्य, सौंदर्यशास्त्र. मुंबई – जपान

तसेच दृश्यवस्तुवर्णनात स्थळाचा संदर्भ येतो. तो सापेक्ष असतो. त्यावरून किती दूर किती जवळ हे ठरवता येते. परंतु आत्मवस्तु अनंत आहे, ती नाही अशी जागाच नाही. त्यामुळेच ती अत्यंत जवळ व अत्यंत दूर आहे. आपण स्वतः आपल्या जितक्या जवळ आहोत, त्याहून आत्मवस्तु अधिक जवळ आहे हा सांगण्याचा भावार्थ आहे.

दूरस्थं चान्तिके च तत्।

बृह् धातुचा अर्थ आहे – मोठा किंवा वाढणारा. त्याच्याहून दुसरे काहीच मोठे नाही ते ब्रह्म!

त्याला स्थळकाळाचे लहान मोठे माप लागू पडत नाही, कारण सर्व स्थळविस्तार त्याच्याच पोटात येतो. त्याच्यापासूनच काळक्रमणेला सुरुवात होते. ब्रह्माला वस्तुपणा लागू होत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

JULY
THURSDAY 28

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि।
सर्व भूतात मी आहे. माझ्यात सर्व भूते आहेत.

अणोरणीयान् महतो महीयान्।
अणुरणिया थोकडा तुका आकाशाएवढा।
अशी अनुभूती येते तेव्हा मायेचा पसारा गुप्त होतो.



© www.madhaveeraghuveer.com

जे सकळांहून मृद कोवळें । जे सकळांहूनही अत्यंत जवळें ।
जे सकळांमध्ये परी निराळें । अलिप्तपणें ॥७०॥
जे हालें ना चालें । जे बोलें ना डोलें ।
आवघे आपणाचि संचलें । येकलें येकटाचि ते ॥७१॥

आत्मस्वरूप सर्वांहून सूक्ष्म आहे. तसेच ते मोठे नाजुक आहे. आपल्या जवळ असलेल्या साऱ्या वस्तुहून स्वस्वरूप अधिक आपल्या जवळ आहे. ते सर्वांच्या अंतर्यामी असून सुध्दा कशालाही चिकटलेले नसल्याने स्वतंत्र आहे.

आत्मस्वरूप आपल्या मूळ अवस्थेपासून कधीही ढळत नाही. त्याच्यात कधी होण्याची संभव नसतो. ते कधी बोलत नाही. ते कधी कंप पावत नाही. अगदी एकच एक असे ते सर्वत्र भरून राहिले आहे.

वस्तु जितकी स्थूल तितकी कडक असते आणि जितकी सूक्ष्म तितकी मृदु व नाजुक असते. पृथ्वी सर्वात कडक तर आकाश सर्वात नाजुक आहे. परंतु त्या आकाशालाही आपल्यात सामावून घेणारे ब्रह्म तर किती मृदु असेल? दृश्य वस्तु सुरुवातीला नाजुक तर नंतर जून, निबर होतात. आत्मस्वरूपाच्या बाबतीत मात्र असे काही संभवत नाही. त्याचे कोवळेपण जन्मच्या तसे टिकून राहते.

या विश्वाचे अधिष्ठान असणारे ते आत्मस्वरूप माझ्या चेतनेचे चैतन्य आहे. ते आहे म्हणून मी आहे. त्याच्या इतके निकट दुसरे काहीच नाही.

या विश्वात आत्मा-अनात्मा यांची सरमिसळ आहे. दोन्हींचे स्वरूप भिन्न असले तरी अनात्म्याच्या अंतर्यामी आत्मतत्त्वच आहे. मात्र ते अलिप्त असल्याने (साक्षी) बाहेरील घडामोडींशी संबंध नाही.



©www.madhaveeragruweel.com

JULY
SATURDAY 30

ते जून, राठ, निबर नाही. कोवळे आहे



आत्मरूप सर्वदेशी आहे. ते अनंत, अखंड व अव्यय आहे. एकदेशी वस्तूंच्या अवस्थेत बदल होतो. त्यांच्या ठिकाणी होण्याचा अनुभव येतो. Becoming भाषेने त्याचे वर्णन करता येते. भाषा म्हणजे द्वैत! आत्मस्वरूप मात्र निर्विकार, निरुपाधिक, स्वगत, अत्यंत सूक्ष्म, निरंतर, सर्वदेशी आहे. ते निःशब्द महामौन आहे.

Becoming --

होणे - मुलगा झाला Graduate, डॉक्टर, I.C.S. आर्किटेक्ट, इंजिनीयर.

शारीरिक - मोठा झाला. तरुण, म्हातारा

सार्थक, कृतकृत्य, वाटोळे, नाश, बरबाद

त्याच्यात बदल नाही. तो जसा आहे तसाच आहे. तरीही कोवळीक आहे. Maintain

31 SUNDAY



© www.madhaveeraghuveer.com

जे आकाशासबाह्य भरले। आणि आकाश जेथे मुराले।
आकाश मुरोनिया उरले। येकलिनसी आपण ॥१२॥
जे चळे ना ढळे। अग्निमध्ये न जळे।
जे चळल्यामध्ये, परी न कळे। उदकी बुडेना ॥१३॥

आत्मस्वरूप आकाशाला आतबाहेर व्यापून आहे. आकाश त्याच्यामध्ये जिरून जाते. एवढे आकाश त्याच्यात शोषले गेले तरी ते जसेच्या तसे म्हणजे अमिश्र राहते.

आत्मस्वरूप चळत नाही व ढळत नाही. अग्नीमध्ये असून ते जळत नाही. वायुमध्ये असून ते हलल्याप्रमाणे वाटते पण कळत नाही. पाण्यामध्ये असून ते बुडत नाही.

सर्वांत आकाश व्यापक आहे इतके की ब्रह्माला त्याची उपमा देतात. खं ब्रह्म असे श्रुति सांगते. पण तरी ते सर्वस्वी खरे नाही. ब्रह्म हे आकाशाला आतबाहेर लपेटून घेते आणि विश्वप्रलयाच्या वेळी आकाशाला पूर्णपणे शोषून घेते. आणि तरीसुद्धा ते शुद्ध व अमिश्र राहते.

इतर चार भूतांना वायु, अग्नि, जल, पृथ्वी यांना व्यापणारे आकाश आहे. ते सर्वांमध्ये असून कोणतेही गुणधर्म त्याला चिकटत नाहीत. मग आत्मस्वरूप तर आकाशापेक्षा सूक्ष्म व व्यापक आहे. ते तर सगळ्यात असून अलिप्त आहे. विश्वाच्या प्रचंड घडामोडींचा स्पर्शसुद्धा त्याला होत नाही. ते चळत नाही व ढळतही नाही.

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः॥

फुटेना तुटेना चळेना ढळेना।
सदा संचले मीपणे आकळेना।



©www.madhaveeraguveer.com

जे शस्त्रे तोडिता तुटेना। जे पावके जाळिता जळेना।
कालविता कालवेना। आपेंकल्नी ॥ ६.२.१४॥
जे चळेना ना ढळेना। जे तुटेना ना फुटेना।
जे रचेना ना खचेना। परब्रह्म ते ॥ ६.३.४॥

पदार्थविज्ञान Physics मान्य करते की हे संपूर्ण जगत हा एकच पदार्थ आहे. त्याला ते Unbroken Wholeness of the Universe

पाणी एकच $H_2O$ तरंग, लाटा, वादळ, त्सुनामी - विशालकाय नौका उध्वस्त, किनारा- घरेदारे परंतु पाणीपणा जसाच्या तसा राहतो. पेल्यातील पाणी

पंचमहाभूतांचा उगम त्याच्यापासूनच झाला. म्हणून ती निष्प्रभ ठरतात.

लहानमोठ्या हेके शकटाच्या परिघाच्या मध्याशी जसा निश्चित अचल न पालटणारा केंद्रबिंदू असतो. तसे विश्वाच्या मुळाशी ते सत्स्वरूप आहे. त्रिज्येच्या अपेक्षेने परिघ बदलतो तसे अहंच्या अपेक्षेने विविधता साकारते.

© www.madhaveeraghuveer.com

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि।
कुटेना। तुटेना चळेना ढळेना ॥१४७॥



जयास कोणीच नेईना। चोर जाता चोरवेना।
कल्पांत झाला तरी वेचेना। अणुमात्र ॥१४८॥
जे ज्ञानचक्षी लक्षिले नव जाये। जेथे आकार भासोंचि जाय।
सांगितले ते साकार होये। म्हणोनि सांगणें न घडे ॥१४९॥

आत्मस्वरूपाला कोणी नेऊ शकत नाही. चोरून न्यायचे म्हटले तरी ते शक्य नसते. जगाचा अंत झाला तरी ते यत्किंचितही कमी होत नाही.

आत्मस्वरूप ज्ञानदृष्टीने पाहता येत नाही. स्वरूपाच्या ठिकाणी आकार लोपून जातो. जे सांगता येते ते साकार होते. परंतु आत्मस्वरूपाच्या ठिकाणी आकारही नाही व सांगताही येत नाही.

या संपूर्ण दृश्य विश्वाला पृथ्वीचा म्हणजे जडद्रव्याचा आधार आहे. या जड गोष्टी इकडून तिकडे नेता येतात. त्याची चोरी करता येते. तुझे-माझे (सोने, रत्ने, खनिज, माती, दगड) करता येते. परंतु प्रलयकाळी तर पृथ्वीसुद्धा विरून जाते. मात्र या पृथ्वीच्या अंतर्यामी असणाऱ्या आत्मस्वरूपाला मात्र पृथ्वीचे गुणधर्म चिकटत नाहीत. म्हणजे आत्मस्वरूप चोरता येत नाही, हलवता येत नाही. कुठे नेता येत नाही. अगदी पृथ्वी पूर्णपणे विरली तरी ते किंचितही कमी होत नाही. थोडक्यात ते विश्वामध्ये पूर्ण वास करूनही विश्वापासून पूर्ण अलिप्त असते.

माणसाला आत्मस्वरूपाचा शोध तर घ्यावासा वाटतो. माणसाला ज्ञानदृष्टी व अज्ञानदृष्टी अशा २ दृष्टी असतात. अज्ञानदृष्टीमध्ये ज्ञाता निराळा व ज्ञेय निराळे असते तर ज्ञानदृष्टीमध्ये ज्ञाता ज्ञेयाशी समरस होतो. वेगळेपणाने उरत नाही. ज्ञानाने आत्मस्वरूपाच्या तादात्म्याने अनुभव येतो. आत्मस्वरूपाच्या ठिकाणी कोणताही आकार नाही. त्यामुळे सर्व आकार ओलांडून त्यापर्यंत पोहोचावे लागते

©www.madhavleeraghuveer.com

AUGUST 04
THURSDAY



आपली भाषा दृश्याचे वर्णन करू शकते. परंतु तिथे भाषा थिटी पडते. आत्मस्वरूपाचे वर्णन करता येत नाही.

त्याला उचलून नेणार तरी कोण? त्याचे सामर्थ्य ते किती? आणि नेऊन ठेवणार तरी कुठे? वस्तुतः कल्पांतात सर्व काही संपून जाते. पण हे संपतच नाही.

© www.madhaveeraghuveer.com

अरे बोलणे तितुके वेर्थ जाते । परी बोलता बोलता अनुभव येते
अनुभव सोडिता ते । आपणाचि होईजे ॥१७॥
ऐसे जरी न बोलावे । तरी म्यां काय करावे ।
न बोलता कळावे । तुज कैसे ॥१६॥

आत्मस्वरूपाविषयी बोलताना असेच बोलावे लागते. त्याला मी काय करू? त्याच्याबद्दल जर मी काही बोललोच नाही तर तुला कळणार कसे?

अरे, आत्मस्वरूपाबद्दलचे बोलणे विरून जाते हे खरे! पण बोलणे ऐकता ऐकताच त्यामधील अर्थ प्रचीतीला येतो. आणि तोही ओलांडला की आपण आत्मस्वरूपच होऊन जातो.

आत्मवस्तु अतींद्रिय आहे आणि शिवाय निःशब्द आहे शब्द ओलांडून मौनात गेल्यावर तिचे खरे ज्ञान होते. हे जरी खरे असले तरी भाषेच्या प्रांतात राहणाऱ्या अज्ञानी शिष्याला हे समजावून सांगण्यासाठी संतांना भाषाच वापरावी लागते. भाषेच्या कक्षेत न येणाऱ्या आत्मवस्तुसाठी उलटसुलट विधाने करावी लागतात. त्याला काही इलाज नाही

आणि नुसते गप्प बसावे तर आत्मज्ञानाची परंपरा चालू कशी राहणार? आत्मज्ञानी पुरुष आत्मज्ञानाबद्दल काही बोललाच नाही तर अज्ञ लोकांना अध्यात्म शिकवणार कोण? हे जाणून संत त्याविषयी बोलतात, लिहितात.

शब्द म्हणजे आवाजाच्या लहरी. त्या विरून गेल्या तरी त्यातून निघणारा, मिळणारा अर्थ बुद्धीत ठसतो, स्थिरावतो पुढे त्यातून मनन घडते. मनन करणारी बुद्धी सूक्ष्म बनते. अशी सूक्ष्म बुद्धी अर्थाशी समरस होते, तदाकार होते. त्याचा निदिध्यास लागतो, तो उत्कट होत जातो. जीव विचारांच्या मर्यादा ओलांडतो आणि आत्मस्वरूप बनून जातो. अशी देहबुद्धी जाऊन आत्मबुद्धी उदयाला येते.



© www.madhaveeraghuveer.com

एका साधुला साधकाने प्रश्न विचारला---
क्या ब्रह्म जानते हो?
जानना क्या है? ब्रह्म ही तो हूँ।।

जितकी इंद्रिये आहेत तितकी Relations आहेत. ते सारे संबंध आहेत, माध्यम आहेत. ती सारी ब्रह्मापुढे व्यर्थ आहेत.
बोलणे व्यर्थ असले तरी बोलता बोलता ते अनुभवाला येते---

बीस दशक, दोनशे समास। साधके पहावे सावकास। विवरता विशेषाविशेष। कळो लागे।

एखाद्या गोष्टीचा विचार करू लागले की त्या गोष्टीशी आपली जवळीक होते आणि मग त्याचा अनुभव कसा घ्यायचा याचा अंदाज येतो. त्यानंतर अंदाजाचे रूपांतर निश्चयात होते, खात्री होते. मग त्याला एक प्रकारची सहजता येते. हा मोठा प्रवास असला तरी सातत्याने करत राहिल्यास त्याचा अनुभव येण्याची शक्यता वाढते.

अनुभव सोडिता न आवणाचि होईजे। — त्रिपुटीतून बाहेर पडायला पाहिजे. अनुभवाच्या पलीकडे जायला हवं. जोवर 'मी' शिल्लक आहे तोवर जे घडायला हवं ते घडत नाही. बारीकसा पडदा मध्ये राहतो. तोही जायला हवा.

07 SUNDAY

मायारूप सुख नयाचे । शोधीन म्हणतां समाधान कैचे ।
मन क्षोभ झाला या सुखाचे । मूळ तुटे ॥७८॥
अहं ब्रह्मास्मि हा गाथा । आला देहबुद्धिचिया माथा ।
देहबुद्धीने परमार्थी । कानकोंडे होईजे ॥७९॥

'अनुभव आला' या म्हणण्यात त्रिपुटी आहे म्हणजेच ते म्हणणे मायिक आहे. त्रिपुटीत राहून खरा ब्रह्मानुभाव घेणे शक्य नाही व त्याने समाधानही होणार नाही. कारण ते वृत्तीज्ञान आहे. ज्ञानेंद्रियांनी घेतलेले अनुभव म्हणजे वृत्तीज्ञान, तसेच होऊन गेलेल्या गोष्टींची आठवण म्हणजे स्मृतीज्ञान हे देखील एक प्रकारे वृत्तीज्ञानच आहे. आपले सारे जीवन हे वृत्तीज्ञानाने व्यापले आहे. त्यातून सुटका झाली तर निर्वृत्तीक अनुभवता येईल. जेव्हा वृत्ती शिल्लक नसतात तेव्हा ज्ञानरूपता येते. मूळ सत् तत्वाशी एकरूपता साधता येते.

अभ्यास करणारी सूक्ष्म अंतःकरणवृत्ती एकदा आत्माकार झाली की मग 'मला सुखाचा लाभ झाला' अशा प्रकारचे त्रिपुटीतील सापेक्ष सुख नाहीसे होते आणि खरोखर सुखरूपता प्राप्त होते.

मला सुख — मी सुखी — मी सुखरूप — सुखरूपता असा सुखाचा प्रवास होतो.

'अहं ब्रह्मास्मि' हे म्हणण्याचा प्रसंग तरी का आला? कारण अहम् चे स्फुरण सतत असते.

अहं जीवोऽस्मि । देहोऽस्मि । अमुकोऽस्मि - - -

मनुष्य हे वेगवेगळ्या पातळीवर वापरत असतो. हे एक प्रकारचे ममत्वच आहे. प्रत्यक्ष जेव्हा ब्रह्म होईल तेव्हा अहं व अस्मि गळून पडेल. केवळ ब्रह्मरूपच उरेल, मग समजवण्याचा प्रसंगच येणार नाही.

'अहं ब्रह्मास्मि' हा शब्द देहबुद्धिच्याच माध्यमातून जन्माला येतो आणि ही देहबुद्धीच



© www.madhavaraghuveer.com

परमार्थाला कानकोंडी करते. संकुचित करते. सामान्याला अनावश्यक असे विशेषत्व देते, त्याला त्याच्या विस्ताराप्रमाणे जाऊ देत नाही. म्हणून देहबुद्धी टाकून द्यायला समर्थ वारंवार सांगतात.

देहबुद्धिचा निश्चयो नाठवावा।

सामान्य →
विशेष → पुरुष × स्त्रिया
गृहिणी × नोकरी
बँकेत × इतर संस्था
महाराष्ट्र बँक —

© www.madhaveeraghuveer.com

देहबुद्धि हे टाकावी। हे ही मायेची उठाठेवी।
म्हणोनी कांय अंगिकारावी। अंगिकारु नये॥२०॥
मायेच्या बळे ब्रह्मज्ञान। मायेकरिता समाधान।
मायाचि गोवी आणि बंधन। तोडी, तेही माया॥२१॥

'मी आता देहतादात्म्य सोडून देईन' अशा निश्चयात सुध्दा मायिक अहंकार आहे. तोही मायेचाच खेळ आहे. मग देहबुध्दी सोडायची नाही का? तिचा अंगिकार करायचा का? तर तसे नाही.

देहबुध्दी परमार्थाला मारक आहे हेही खरे! परंतु तरीही देहबुध्दी पूर्णपणे सोडता येत नाही. कारण देहबुध्दी सोडली असे म्हणणे ही देखील भ्रांति आहे. माणसे आपापल्या सोयीनुसार अर्धी-अर्धी वाक्ये लक्षात ठेवतात व शब्दात पकडतात.

मनुस्मृतीतील वाक्याची मोडतोड करून विपरीत अर्थ काढला जातो.

पिता रक्षति कौमारे भर्ता यौवने रक्षति।
पुत्रो रक्षति वार्धक्ये न स्त्री स्वातंत्र्यमर्हति॥

असे कुठलेतरी संदर्भरहित वाक्य धरून स्त्रियांना स्वातंत्र्य देऊ नये असा निष्कर्ष काढतात. परंतु मनुने वस्तुतः स्त्रियांचा गौरव केला आहे. स्त्री अतिशय मौल्यवान असल्याने तिचे उत्तम प्रकारे रक्षण करावे असा आदेश मनुस्मृती देते.

त्याचप्रमाणे देहबुध्दी हा अडथळा असला तरी उगीच देहाला क्लेशही देऊ नये. देह हा मिथ्या/नाशिवंत आहे. आणि जर मिथ्या वस्तूला कवटाळून राहिले तर सत्याचा पाठपुरावा करता येणार नाही. अनित्याचा मागोवा घेत गेले तर नित्य वस्तू गवसणार नाही.

न हि अध्रुवेन प्राप्यते हि ध्रुवम् । कोम--

अनित्याच्या तादात्म्यामुळे नित्याचे तादात्म्य दूर राहते. हा त्याचा भावितार्थ आहे.

माणसे सोयीप्रमाणे अर्थ काढतात. आता इथे देखील देहबुद्धी पूर्णपणे टाकणे शक्य नाही असे म्हटल्यावर मग 'देहबुद्धी ठेवावी का? असा लगेच प्रश्न येतो.

परंतु शास्त्र सांगते — देहबुद्धी सोडावी हे जितके खोटे आहे, तितकेच अंगिकारावी हेही खोटेच आहे. परंतु अध्यात्ममार्गात असे बोलावे लागते. गणितासारखी स्पष्ट उत्तरे यात नाहीत. म्हणून तर अर्जुनासारख्या विचक्षण श्रोत्याचाही गोंधळ उडाला — — व्यामिश्रेणैव - - -

देह हा जरी मायिक असला तरी मायेचे भान असतेच ना! माया जरी देहबुद्धीला जबाबदार असली तरी मायेचा त्याग करायचा म्हणजे मायेला सोडून कुठे पळून जायचे नाही. तर फक्त तिचे मिथ्यत्व ओळखायचे कारण कुठेतरी जरी पळून गेलो तरी तिथे मायेचे कोणते ना कोणते स्वरूप असणारच आहे. त्यामुळे जे जे मायिक आहे ते नीट समजावून घ्यायचे आणि त्यात गुंतून पडायचे नाही. आसक्त व्हायचे नाही.

Know the system Use the systeme
Get the results Forget the systeme.

श्री० अरविंद- Know yourself thoroughly & then forget " completely.

यावर उपाय आहे तो म्हणजे गुरुकृपा—

©www.madhavgharpure.com

विषय व्याळे मिठी । दिधलिया नुठी ताठी ।
ते तुझिया कृपा दृष्टी । निर्विष होय ॥

विषयरूप सर्पाने जरी घट्ट आवळून धरले असले तरी जर गुरूंनी त्यांच्या दृष्टीने त्या सर्पाकडे पाहिले तर त्यातील विषयाची निवृत्ती होईल. सर्प निर्विष होईल. आणि सद्गुरूकृपेने अशी दृष्टी मला मिळाली तर माझ्यावर असलेले विषयांचे बंधन शिथिल होईल. निवृत्त होईल. (कारण गुरु विषयांकडे मिथ्या दृष्टीने पाहतात.) विषय हे स्वतः अचेतन असल्याने त्यांच्यामध्ये मला सुख देण्याचे सामर्थ्य नाही. हा विवेक जागा होतो.

अचेतन गोष्ट एकाला सुख देते तर दुसऱ्याला दुःख देते. माझ्या घरातील गाडी मला सुख तर इतरांना दुःख देते.

राग-द्वेष हे सर्पाचे दोन दात काढून टाकले तर सर्प निरुपद्रवी ठरतो.

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।

याच मायेच्या विवेकाने वापर केला तर ती बंधनातून सोडवते आणि तिच्या प्रवाहाबरोबर वाहत गेले तर ती प्रवाहात अडकवून ठेवते.

©www.madhavaeraghuveer.com

Only dead fish travels with the Stream.



मायेच्या बळे ब्रह्मज्ञान । मायेकरिता समाधान ।
मायाचे गोष्टी आणि बंधन तोडी, तेही माया ॥

माया हि कुलुपातील किल्ली प्रमाणे आहे. दोन्ही प्रकारे काम करते. तिचा तेवढ्यापुरता उपयोग करून घ्यायचा. चष्मा, मोबाईल, कार

जीवनाचा खरा अर्थ काय? लक्ष्य काय? साधन काय? चैतन्य येते कुठून? जाते कुठे? हे सृष्टीचक्र कसे चालते? त्यात माझे स्थान काय? कोऽहम्? कथम् इदं जातम्?

हा विचार मनात येणे, त्याचा मागोवा घेणे हेच तर परमार्थाचे मूळ आहे. याची उत्तर मिळवण्या साठी प्रवाहाविरुद्ध पोहत जावे लागते. तेव्हा उत्तरे सापडतात. जन्माद्यस्य यतः - ब्रह्मसूत्र -- हा प्रवाह कुठून सुरू झाला? हे सर्व कशापासून निर्माण झाले? असा शोध घेत घेत मुळापर्यंत जायचे. करी सूक्ष्मसंवाद जो उगमाचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

असा विचार सतत करत राहिलो तर आतला निश्चय मला सांगतो - शरीर जरी प्रवाहाबरोबर वाहत गेले तरी मी अबाधित आहे मी वाहत जात नाही. शरीराचे जे सहा विकार आहेत ते त्यांच्या मार्गाने जाणार आहे. मात्र मी निर्विकार

14 SUNDAY

असल्याने मी वाहवत जाणार नाही. हा निर्णय हा निश्चय सातत्याने सांभाळत राहणे हेच साधना आहे आणि ती नित्य करत रहायची. आणि कधीतरी या साधनेचा कस लागतो. बिकट प्रसंग उभा ठाकतो त्यावेळी जो या कसाला उतरतो तो खरा पारमार्थिक। जीवनाबद्दल जो तक्रार करतो तो खरा भक्तच नाही असे गोंदवलेकर महाराज म्हणतात.



© www.madhaveeraghuveer.com

माया आपणास गोवी । आपणास आपण वेढा लावी ।
प्राणी दुखावेती जीवी । अभिमाने करूनी ॥२२॥
जैसा सारिपाट खेळती । सारी येकाच्या मागोन आणती
खेळो बैसता वाटून घेती । आपुल्याला ॥२३॥

माया स्व पर निर्वाहक आहे. अवघ्या प्रकृतीच्या जीव अज्ञानामुळे इतर जीवांना व जड सृष्टीला सत्य मानतो. तो स्वतःच्या शरीराला (पंचमहाभूते व मन, बुद्धि अहंकार यांच्या मोळीला) मी मानतो व इतर जड सृष्टीला माझे म्हणतो. (माझे घर, पत्नी, मुले, नातेवाईक) म्हणजे 'मी' पासून तो 'माझे' कडे जातो. अहंपेक्षा ममता घातक आहे. कारण माझे जेवढे अधिक व चांगले तेवढा 'मी' फुगत जातो. 'माझे माझे' मुळे 'मी' ला महत्व येते. त्यातून ममत्व घट्ट होत जाते.

अज्ञानं मे वस्त्रं मे गाव्या मे बन्धुवर्गो मे ।
इति मे मे कुर्वाणं कालवृको हन्ति पुरुषाजम् ॥

'माझे माझे' करण्यात सर्व आयुष्य जाते. परंतु मृत्युनंतर बरोबर काहीच येत नाही. (सिकंदरच्या मुठी उघड्या होत्या (मृत्यु समयी)). असे हे सगळे निर्माण करणारी मायाच आहे. जीवाभोवती बंधन घालते. त्यातून केवळ दुःखच वाट्याला येते. जितका अभिमान अधिक तितके दुःख अधिक होते.

सारीपाटाच्या खेळात काळ्या / पांढऱ्या सोंगट्या असतात. त्याही आपल्या नसतात. मागून आणलेल्या असतात. तरी त्या सुद्धा आपल्या म्हणून वाटून घेतात. खेळाला रंगत येत जाते तसतशी एकेक सोंगटी मिळते किंवा मरते. अनुकूल / प्रतिकूल दान पडेल तसतसे दोन्ही पक्ष इरेला पडतात. आपली सोंगटी मेली



© www.madhaveeraghuveer.com

की अतिशय दुःख होते आणि दुसऱ्याची मेली की अक्षरशः आसुरी आनंद होतो.

प्रसंगी खोट्या खेळाची शंका घेऊन भांडणे करतात. एकमेकांचा जीव घ्यायलाही मागे पुढे पहात नाहीत. परंतु खेळ संपला की तो पट त्या काळ्या/पांढऱ्या किंवा लाल/पिवळ्या सोंगट्या एकाच डब्यात जातात किंवा त्याचा त्याला सारीपाट परत केला जातो. मग हे आयुष्य तरी काय आहे?

शिवशक्तीच्या अद्वितीयाचा खेळ चालला भुवनपटी
त्रिगुणांचे हे तीनच फासे चराचरातुनि निनादती॥
कधी उलटे कधी सुलटे पडती

आपल्या सोंगट्यांविषयी ममत्व असते. मनाविरुद्ध फासे पडले तर आपण संतापतो. त्या निर्जीव फाशांना 'दे दे' म्हणून अनुकूल दान मागतो. खेळ संपल्यावर आपण सोंगट्यांविषयी ममत्व ठेवत नाही. विसरून जातो.

मग हाच विचार जीवनाच्या सारीपाटाबाबत व्हायला हवा. वास्तव स्वीकारायला हवे. घटना प्रारब्धानुसार घडत जातात. त्या अतिशय सहजपणे स्वीकारायला हव्यात. तशी क्षमता निर्माण झाली की जीवन आनंदमय होते. वेदांतशास्त्रातील या गोष्टी काळ्या दगडावरील रेघेसारख्या आहेत.

यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ।

© www.madhaveerdhuveer.com

नसताचे अभिमान माथा। सारी मरता परम गेथा।
डाव येता सुखस्वार्थी। दोघेही पडिले ॥२४॥

सारीपाटाच्या खेळात जेव्हा आपली सोंगटी मरते तेव्हा अगदी कोणीतरी जवळची व्यक्ती मेल्याइतके दुःख होते. आणि तेच, जेव्हा आपण दुसऱ्याची सोंगटी मारतो तेव्हा इंद्रपद प्राप्त झाल्याचा आनंद होतो. खरं तर सोंगटीने सोंगटी मारता येते का? किंवा सोंगटी मरते का? तिने पटावर स्थान मिळवले म्हणजे काही खरं साम्राज्य मिळवले का? तिचे लाकडपण/प्लॅस्टिक तसेच कायम रहाते. सोंगट्यांची संख्याही वाढत नाही. पण खेळणारे मात्र अगदी जीव तोडून खेळतात.

सगळे महाभारत घडले त्याचे एक कारण म्हणजे द्यूत आहे. अगदी विभूतियोगामध्ये देखील 'द्यूतं छलयतामस्मि' असे म्हटले आहे. अर्थात त्याकाळी 'द्यूत' हा युद्धनीतिचा भाग होता.

© www.madhaveeraghuveer.com

फासयास देहे म्हणती। येक ते चिरडी येती।
कोथ्या घेटल्या घेती। जीव येकमेकांचा॥ २७॥
तैसा कन्या पुत्र आणि नारी। बाटून घेतल्या संसारी।
अभिमान वाहती शिरी। देहयोग प्रपंचाचा॥ २८॥

लोक हातात फासे घेतात आणि जणू काही ते निर्जीव फासे यांच ऐकणार आहेत अशा भावनेने दे दे दो दे असं ओरडून सांगतात. आणि मनासारखे दान पडले नाही तर अगदी दात ओठ खातात. हा केवळ मूर्खपणा आहे असं तटस्थतेने पाहताना आपल्याला पटते परंतु प्रत्यक्ष जीवन जगताना आपण असेच वागतो. क्षुल्लक गोष्टीवरून वाद घालतो. भाजीत मीठ जास्त झाले. माझ्या कारच्या पुढे त्यांची कार गेली. सोसायटी, कमिटी मध्ये कुणी कुणाची अक्कल काढली की झाली सुरुवात। आणि हाच नियम आपल्या पत्नी, मुलंबाळां च्या संदर्भात येतो. कांचन कामिनी / द्रव्य दारा। प्रारब्धयोगाने हे सर्व एकत्र येतात. तेवढ्या पुरते ऋणानुबंध जडतात. परंतु नंतर ताटातूट होते परंतु ती आपली Property नाही. काही काळ त्यांची काळजी घेण्यापुरती माझी नेमणूक केली आहे याचे भान ठेवायचे. ते कर्तव्य मनापासून करायचे आणि बाजूला व्हायचे.

© www.madhaveeraguruveer.com

ऐवं इतुकी वेळा काविली। ते माया खेळे येकली।
ते मायेनेच वारिली। पाहिजे माया॥२५०॥
ते माया तोडिता अधिक जडे। म्हणोनि धरिली तेवढे।
धरिता सोडिता ते नातुडे। वर्म कळल्याविणे॥२५१॥

संसारात गुरफटून टाकणारी मायाच आहे. मायाच हे खेळ खेळते. मायेनेच हा खेळ उत्पन्न केला आहे हे कळणे म्हणजे ज्ञान आहे.

माया ही अनंत परमात्म्याची अनंत शक्ती आहे. तिचाच हा खेळ आहे याची जाणीव निर्माण व्हायला पाहिजे. जोपर्यंत ही जाणीव नसते, तोपर्यंत जीव बहिर्मुख असतो. अशा बहिर्मुख जीवाला माया अधिकाधिक गुंतवते.

परंतु कधीकधी संसारातील सुखदुःखाचे प्रसंग दणका देतात. आपण जे स्वतःला कर्ता समजत होतो ते काही तितकेसे खरे नाही. आपले कर्तेपण लंगडे आहे. कर्ता-करविता मी नाही. तो कोणी वेगळाच आहे.

तुझिया श्वासे पान हलते।
स्पर्शे तुझिया फूल फुलते।
तेज झळाळत गगनही झुलते
रवि चंद्राच्या नूर निमीला।
शरण तुला भगवंता॥ तूच कर्ता----

विश्वामध्ये इतक्या साऱ्या घडामोडी घडतात त्या सर्वांचा नियंता, शास्ता कोणीतरी वेगळा आहे. मी या सर्व पसाऱ्यात यःकश्चित आहे. माझा माझ्या प्रपंचावर नियंत्रण नाही. माझा देहदेखील माझ्या ताब्यात नाही. अनाकलनीय, अकल्पित, अनपेक्षित प्रसंग आयुष्यात घडतात. त्यांचा कार्यकारण भाव मला समजत नाही.

आकळणाऱ्या पलीकडे आहे. असे जाणवते तेव्हा त्या अदृश्य शक्तीपुढे नतमस्तक होण्यापलीकडे माणसाच्या हातात काहीच उरत नाही. तेव्हा साधक अंतर्मुख होतो. जीव असा अंतर्मुख झाला की मग माया हळूहळू त्याला सोडते. हृदयाच्या निवडीतून धावा करते. त्यासाठी तिला शरण जायला हवं मग मायेचा खेळ थांबतो. मायाच मायेचं निवारण करते.

परंतु मायेला तोडता म्हटलं की ती अधिक आवळली जाते. धरतो म्हटलं तर ती सापडत नाही व तोडतो म्हणावं तर ती तुटत नाही. धरणे/सोडणे यामध्ये देखील कर्तृत्वाचा अभिमान आहेच. अति Conscious झाला की हातून चुका घडतात. त्याची कार्यक्षमता कमी होते. (अमिताभ-कुली)

श्रीमंतीच्या अभिमानापायी स्वास्थ्य हरवून जाते. माया ही मृगजळासारखी आहे. ती हातात येत नाही पण खोटीही म्हणता येत नाही. आपल्या अंगी जो कर्तेपणा आहे असे आपण मानतो तोही मायेचाच खेळ आहे. त्यामुळे मायेचा निरास करण्याचा प्रयत्न सपशेल फसतो. उलट मायेची पकड घट्ट होत जाते. परंतु हे पाहून काहींना वाटते की एवीतेवी माया सुटत नाही तर मग तिलाच घट्ट धरून रहावं. परंतु मायेला चिकटून राहिल्याने काही जी स्वाधीन होत नाही.

21 SUNDAY

म्हणजे तिला धरल्याने किंवा तोड म्हटल्याने ती सुटत नाही. मग तिचा निरास कसा होणार?

त्याची खुबी समजावून घ्यायला हवी ती पुढील ओवीत सांगतात — — — — —

© www.madhaveeraghuveer.com

जैसे चक्रविहूचे उगवणे। बाहेर येऊनि आत जाणे।
कां भीतरी जाऊनि येणे। अकस्मात बाहेरी ॥२९॥
कां त्या कोळीयांच्या कड्या। गुंतगुंतानी उगवाव्या।
तैसी जाण हे माया। गुंतोनी उगवावी ॥३०॥

(कोडी घालणारे)

युद्धामध्ये व्यूहरचना असते. भलेभले इथे फसतात, गोंधळतात, भांबावतात. परंतु खरा योद्धा त्या व्यूहात बाहेरून आत शिरतो व अतिशय चलाखीने व गतीने त्यातून बाहेर पडतो. असे कुशल योद्धे संख्येने कमी असतात. त्याचप्रमाणे या भुलवणाऱ्या भुलभुलैय्यातून म्हणजेच मायेच्या जंजाळातून बाहेर पडणे अवघड असले तरी अशक्य नाही. थोर महापुरुषांनी या मायेचे वर्म जाणून तिचा निरास केला आहे व ब्रह्माची प्राप्ती करून घेतली आहे.

व्यवहारातदेखील जादूगार जादू करतो. धातुच्या, पितळेच्या, स्टीलच्या सात-आठ कड्या सहज बोलता बोलता एकमेकात गुंतवून टाकतो आणि तितक्याच सहजतेने त्या मोकळ्याही करतो. पाहणारा प्रेक्षकवर्ग चकित होतो.

एकमेकात गुंतवणे ही माया आहे व त्या गुंत्यातून त्या कड्या मोकळ्या करणे ही देखील मायाच आहे. अशी अनेक कोडी असतात. ससा → गाजर | पिल्लू → आई
अनेक रस्ते Maze |

उकरीकडून सुरुवात केली तर कदाचित उत्तर सापडू शकते. ही कोडी एकमेकातून मोकळी करण्यासाठी ती आधी आपण उकलली पाहिजेत. मग त्यातील खुबी सापडते.

मायेचे ही तसेच आहे. शांत चित्ताने 2016 Logically विचार करावा. ती कशी गुंतवते

AUGUST TUESDAY 23

| S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 31 | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

हे जाणून घेतले तर त्यातून बाहेर पडणे जमू शकते तसा प्रयत्न करावा. लगेच यश येईल असेही नाही. परंतु पुन्हा पुन्हा प्रयत्न करत गेले तर निश्चित मायानिरासाचे मर्म समजून येईल. व आपोआप मार्गही सापडेल.

शब्दवेध, शब्दकोडी, सुडोकू, Jigsaw puzzle यातून बुद्धीचा कस लागतो व त्यातून आध्यात्मिक उन्नती होऊ शकते.

© www.madhaveeraghuveer.com

आत्मा - अनात्मा

शाश्वत - तात्पुरते

प्रत्ययाला येते पण खरे नसते ते



माया

माया साडिता कैसी साडावी। तोडोनी कैसी टाकावी।
येथे विचारे पहावी। नाथिलीच हे ॥३१॥
बहु नाटकी हे माया। धिपणे न जाये विलया।
विवेके पहाता येथे या। ठावोचि नाही ॥३२॥

माया समजायची कशी? सोडायची कशी आणि तोडायची कशी? या सर्वांसाठी एकच उपाय — मायेकडे विचाराने पहावे. नीट समजून उमजून पाहिले असता ती नाहीच आहे हे ध्यानात येते. मग 'ती नाहीच आहे' हे लक्षात आल्यावर सोडणे काय किंवा तोडणे काय यांना अर्थच उरत नाही. अरे जी नाहीच नाही त्याची वार्ता पुससी काय?

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः॥

जे नाही त्याचे बंधन आहे असे म्हणणे देखील चुकीचे आहे. कारण बंधनच खरे असेल तर त्यासाठी प्रयत्न करणे देखील चूकच आहे. बाधक आहे असे आपण समजतो म्हणून मग ते सोडवण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. व्यापारी-[illegible] प्रपंच आपल्याला धरून ठेवत नसतो तर आपणच प्रपंचाला पकडून ठेवले आहे. त्याचप्रमाणे 'माया धरते' म्हणणे बरोबर नाही कारण ती नाहीच आहे। आणि हेच विचारांनी समजून घेणे म्हणजे माया आहे.

ही माया अतिशय नाटकी आहे. ती नाना प्रकारचे वेश घेते कधी व्यवसाय नोकरी, प्रपंच, कोर्ट कचेरी, सम्प्रदाय, महंत. अशी अनेक रूपे घेणारी मायाच आहे



© www.madhaveeraghuveer.com

म्हणजे ती केवळ प्रापंचिकांच्याच नाही तर स्वतःला ज्ञान्यासी म्हणवणाऱ्यांच्या मागे देखील ही लागते.

जपजाप्य, नियम, अनुष्ठान, साधना, कर्मकांड यात अडकणारे देखील मायेतच गुंतणार. तिथे जरी घर नसले तरी मठ आश्रम असतातच. त्यांचा व्यापही असतो.

खरा अभिनेता जसे स्वतःचे रूप विसरून त्या त्या भूमिकेत शिरतो. तशीच माया ही जीवाला भुलवते. ती दृश्यामध्ये अनेक रूपे घेऊन मोहात टाकते, नादी लावते. जीवाच्या ठिकाणी जो मीपणा विलसत असतो, तेही तिचेच स्वरूप आहे. तो मीपणा त्याला खराच वाटतो आणि त्याच्याच सहाय्याने तो मायेचा निरास करायला जातो पण त्या खटपटीत माया आपला पाश अधिकच आवळते, घट्ट करते. बरं विवेकाने जर त्या मीपणाचा शोध घ्यायला गेलो तर तो काही हाती लागत नाही. तेव्हा साधकाला कळून चुकते की आपला मीपणा भ्रामक आहे, तात्पुरता आहे, केवळ दर्शनी आहे. परंतु हा मायेच्या कचाट्यात असा काही अडकून जातो की बाहेर पडणे शक्य होत नाही.

वर्म हेंचि माया मर्क। याचा करावा विवेक।
विवेक केलिया अनेक। येकी मुरे॥३३॥
येकी अनेक आटोक। येकपण अनेकासवें गेलें।
उपरी जे निःसंग उरलें। तेचि स्वरूप तुझें॥३४॥

माया मिथ्या आहे, भासमय आहे हेच तिच्या वहुकेचे वर्म आहे. या वर्माचा खोल विचार करावा. अशा विवेकाने समजू लागते की हा जो अनेकपणा (नानात्व) आहे त्यामागे एकच आत्मस्वरूप आहे. आणि विवेकप्रकाशाने ही बहुरंगी, बहुढंगी माया त्या एका आत्मस्वरूपात विलीन होऊन जाते. Uniformity in Divercity. विविधतेमध्ये एकता दिसू लागते.

सर्वसामान्य माणसाला या दृश्य विश्वाला मिथ्या मानणे कठीण जाते. कारण जे दिसते आहे ते शून्य कसे मानणार? परंतु संत सांगतात त्यावरही श्रद्धा असते. मग जे दिसते, भासते ते निश्चित काय आहे हे काही ध्यानात येत नाही.

त्याला उत्तर असे आहे की या दृश्याला जो आपण अंतिम खरेपणा देतो तो काही खरा नाही. त्यासाठी सूक्ष्म विचार करून दृश्याचे भासमय स्वरूप समजावून घ्यायला हवे आणि हेच आहे मायेचे वर्म! आणि एकदा का हा विचार मनात स्थिर झाला की, दृश्याचे अनेकपण स्वरूपाच्या एकपणात लीन पावते आणि हाच आत्मस्वरूपाचा अनुभव आहे.

अनेकपणा एकपणात जिरून जातो. आणि एकपण येथील अनेकपणासमवेत अंतर्धान पावते. आणि जे उरते ते केवळ आत्मस्वरूप तेच तू तुझे खरे स्वरूप समज.



© www.madhaveeraghuveer.com

एक आणि अनेक या कल्पना सापेक्ष आहेत
जे एक नाही ते अनेक! ज्या एकातून ते
अनेकपण बाहेर येते त्यामध्ये पुन्हा ते ज्योत
विलीन झाले की उरते ते एकटे एक-तत्त्व
परमात्मतत्त्व! वेदान्तामध्ये त्याला एकमेवाद्वितीय
म्हटले आहे. त्याला उपमा नाही. त्याला जोडी नाही.
दुसरी न जोडी। तुज कोण मोडी।
सर्व संबंधरहित जे आत्मस्वरूप आहे तेच
आपले खरे स्वरूप आहे.

एक म्हणायला दोनची जाणिव असावी
लागते. जिथे दोनची जाणिव नाही, तिथे एकाला
अस्तित्वच नाही. दोन या कल्पनेतून एकाचा
जन्म झाला आणि त्यानंतर या पुढच्या
संख्या निर्माण झाल्या. शंभर, हजार, लक्ष,
कोटि, अब्ज इ. या सर्व संख्या एकातीत
मुरतात तेव्हा एकपणा देखील संपून जातो.
आणि उरते ते निःसंग रूप – स्वरूप.

28 SUNDAY



© www.madhaveeraguveer.com

तुझे स्वरूप तुजचि न कळे। ते ज्या साधने आकळे।
ते साधन एक सोहळे। भोगिसी स्वानंदाचे॥३५॥
इति श्री आत्माराम। सांगेल पुढील साधनवर्म।
जेणे भिन्नत्वाचा भ्रम। तुटोन जाये॥३६॥

आपले खरे स्वरूप आपल्याला कळत नाही. ते ज्या साधनाने कळते ते साधन आता ऐकावे. ते साधन केले असता स्वानंद सोहळा उपभोगता येईल.

साधु, संत आपल्याला नेहमी सांगतात की स्वरूपाचे विस्मरण हेच सर्व दुःखांचे मूळ आहे आणि त्याउलट स्वरूपाचे ज्ञान हा सर्वोच्च आनंदाचा ठेवा आहे. खरेतर स्वरूपज्ञान हे स्वतःसिद्ध आहे. ते प्राप्त करण्यासाठी कुठे जावे लागत नाही. ते निरंतर आहेच. परंतु त्यावर अज्ञानाचे आवरण पडल्याने ते झाकले जाते. हे आच्छादन दूर करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. त्यालाच अध्यात्मशास्त्रामध्ये 'साधन' म्हणतात.

तत्वज्ञान व अध्यात्मशास्त्र यात अंतर आहे. तत्वज्ञान हा बुद्धीचा खेळ आहे. तत्वज्ञान सद्वस्तूच्या स्वरूपापर्यंत जाऊन थांबते. ईश्वरा। परंतु त्याच्याही पलीकडे नेऊन प्रत्यक्ष अनुभव देणारे ते अध्यात्मशास्त्र आणि म्हणूनच संतवाङ्मयातील तत्वज्ञानाला साधनाची जोड असते.